# वार्षिक अहवाल

( वरिष्ठ महाविद्यालय )

### * इच्छाशक्ती व प्रयत्न हवेत *

**स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वभाषा, नि स्वराष्ट्र या पाच मूलभूत गोष्टींचा अभिमान (मात्र दुरभिमान नव्हे !) धारण करणे, त्यांच्या संरक्षणासाठी नि अभिवृद्धीसाठी तन-मन-धनाने झटणे, त्यांची सेवा करणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्यच होय. त्यांच्यावरील पराभक्तीतूनच आणि जोडीने चातुर्य, विज्ञाननिष्ठता, संशोधन,दीर्घोद्योग नि कष्ट यांची कास धरूनच इंग्लंड, जपान, इस्त्राईलसारखी लहान तर जर्मनी सारखी मध्यम नि अमेरिका-चीनसारखी विशाल राष्ट्रे अभ्युदयाच्या शिखरावर जाऊन पोचलीत.आपले राष्ट्रही त्याच गुणवत्तेच्या आधाराने अभ्युदयाच्या शिखरावर गेल्यावाचून राहणार नाही. पण त्यासाठी आपणाजवळ तशी तीव्र इच्छाशक्ती नि पाठोपाठ प्रयत्नही हवेत.**

**- द.स.हर्षे,** 'सकाळ सप्तरंग' पुरवणी, दि.५/२/२००६

**अहवाल-समिती**

| शब्दांकन व मांडणी | निर्मिती व संकल्पना |
|---|---|
| **प्रा.डॉ. विजय बाणकर** | प्राचार्य **रमेशचंद्र खांडगे,** |
| **श्री. लक्ष्मीकांत आगलावे** (प्रबंधक) | **प्रा. साहेबराव गायकवाड** |
| **प्रा. अशोक भाटे** (सदस्य ) | अध्यक्ष, विद्यार्थी मंडळ |

## राष्ट्रीय चर्चासत्र
## १



'साहसे श्री: प्रतिवसति ।' हे आमच्या अ.ता.ए.सोसायटीचे ब्रीदवाक्य आहे. साहसी माणसाने ठरवले व पाऊल उचलले, की सर्व प्रकारची मदत त्याला आपोआप मिळते, असे आमचे प्राचार्य श्री.रमेशचंद्र खांडगे नेहमी म्हणत असतात आणि त्याप्रमाणे कार्य देखील ते करून दाखवतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे या शैक्षणिक वर्षी **संयोजक** म्हणून त्यांनी आपल्या महाविद्यालयात यशस्वीपणे आयोजित केलेले 'राष्ट्रीय चर्चासत्र' (नॅशनल सेमिनार) हे होय !

अकोले सारख्या ग्रामीण भागात राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र घेणे, ही शैक्षणिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाची व म्हणूनच उल्लेखनीय अशी कामगिरी व घटना आहे.

पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने आपले महाविद्यालय आणि 'मुव्हींग ॲकॅडमी ऑफ मेडिसिन ॲण्ड बायोमेडिसिन,पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० व ११ डिसेंबर २००५ रोजी महाविद्यालयात संपन्न झालेल्या या चर्चासत्राचा विषय होता : **'जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञानातील नवे प्रवाह'**.

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि.ग. भिडे यांचे हस्ते या चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले. राष्ट्रीय स्तरावरील पुढील ख्यातनाम मार्गदर्शकांची व्याख्याने झाली : डॉ. विद्या पटवर्धन (जनुकाचे स्वरूप, कार्य व नियंत्रण), डॉ. एम्. हेगडे (प्रथिन रसायनशास्त्र), डॉ. सुजाता वैद्य (गुणसुत्रे व पेशी अनुवंशिकता), डॉ. सुधा गांगल (रोग प्रतिकारक शक्ती शास्त्र), डॉ. विद्या कोठेकर (जैव तंत्रज्ञान) डॉ. एम.जी.देव (भ्रमण जैवतंत्रज्ञान कार्यक्रम), डॉ. चंदन कुमार (जनुक सूक्ष्म तंत्रज्ञान), डॉ. रॉबीन मुखोपाध्याय (एच.आय.व्ही. निदान पद्धती). पाच संशोधकांनी संशोधनपर लेख सादर केले. या चर्चासत्राच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. देशभरातून सहभागी झालेल्या प्रतिनिधींची १६२ ही संख्या या राष्ट्रीय चर्चासत्राच्या गुणात्मक पैलूला अधिकच प्रकाशित करणारी परिमाणात्मक बाब होय. अ.ता.ए.सासायटीचे विश्वस्त मा.डॉ. बी. जी. बंगाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत या चर्चासत्राचा समारोप झाला. सदर चर्चासत्र यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संयोजक मा.प्राचार्य श्री रमेशचंद्र खांडगे, समन्वयक **प्रा. केशव नाईकवाडी** व **सचिव प्रा. संजय ताकटे** यांना विज्ञान व प्रशासन विभागातील सर्वांनी उत्तम सहकार्य केले.

## विद्यार्थी मंडळ
## २



'महत्त्वाचे काय आहे तर एकत्रित विचार ! एकट्याचा विचार नव्हे !' या सुविचाराचे एक मूर्तिमंत रूप म्हणजे 'विद्यार्थी मंडळ' होय.

कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांतून मिळणाऱ्या ज्ञानाबरोबरच ' माणुसकी धर्माचा अर्थ जाणून' त्या प्रमाणे कृती करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील असतो : माजी विद्यार्थिनी कु. पूनम मोढे हिच्या धाकट्या



*जो माणूस आपल्या आयुष्यातील एक तास फुकट दवडण्यास तयार असतो त्याला जीवनाचा अर्थच समजलेला नाही असे म्हणावे.* **– चार्लस् डार्विन.**

भावाला औषधोपचारासाठी तसेच श्री.डावरे या आमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूला त्याच्या पायावरील शस्त्रक्रियेसाठी **विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष, प्रा.साहेबराव गायकवाड** यांनी आम्हा विद्यार्थी-प्रतिनिधींच्या सहकार्याने आर्थिक निधी गोळा करून दिला: 'वंगभंग' आंदोलनात शहीद झालेल्या वीरांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहणे आणि 'शिक्षक दिन' अगदी कृतज्ञतापूर्वक साजरा करणे, ही त्याची आणखी दोन ठळक उदाहरणे होत.

विद्यापीठ नियमाप्रमाणे विद्यार्थी मंडळातील प्रतिनिधींची निवड होऊन विद्यापीठ-प्रतिनिधी म्हणून मी शुभांगी तळेकर निवडून आले. त्यानंतर एक सप्टेंबर २००५ रोजी सिने-अभिनेते मा.श्री. श्रीकांत मोघे यांचे शुभहस्ते विद्यार्थी-मंडळाचे उद्घाटन झाले. अहमदनगर जिल्ह्यातील 'सार्वमत वृत्तसंस्था ' व आमच्या महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'सार्वमत युवा मंचाची' स्थापना करण्यात आली. श्री नारायणजी सुमंत यांच्या काव्यवाचनास दिलेला उत्कृष्ट प्रतिसाद हे आमच्या विद्यार्थ्यांच्या सुजाणतेचे सूचक होय, हे विनम्रमणे नमूद करणे आमचे कर्तव्यच होय; शेतकऱ्यांची दयनीय स्थिती, त्यांच्या हृदयद्रावक व्यथा व सरकारी योजनातील कथित भ्रष्टाचारावरील कविता व विडंबनाने श्रीनारायणजी सुमंत यांनी श्रोतृवर्गाला सहानुभूतिपूर्वक विचार करण्यास भाग पाडले.

महाविद्यालय हे जणु एक सदाहरित उद्यान ! पारंपारिक वेशभूषेने सजून आलेल्या तरूण-तरूणींनी 'परंपरा दिनीं ' या उद्यानाला अधिकच शोभायमान केले. परिणामी लाभलेला संस्मरणीय आनंद त्यानंतरच्या 'सारी अँड टाय डे' ने द्विगुणित केला. स्नेहसंमेलनानिमित्त 'व्यक्तिमत्व विकास स्पर्धेचेही' आयोजन करण्यात आले.

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

३



पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वैद्यकीय दृष्ट्या सशक्त असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी क्रीडा व शारीरिक शिक्षण किंवा राष्ट्रीय छात्र सेना (एन्.सी.सी.) मध्ये भाग घ्यावयाचा असतो. अर्थात्, बौध्दिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण व राष्ट्रीय संरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव यागोष्टीही महत्त्वाच्या आहेत.

**जिमखाना समितीचे** अध्यक्ष मा.प्राचार्य श्री रमेशचंद्र खांडगे, **कार्यकारी अध्यक्ष प्रा. शिवाजीराव दिघे** यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांना सदस्य म्हणून प्रा.डॉ.विजय बाणकर, प्रा.बाळासाहेब देशमुख व प्रा.सोपानराव साळवे यांनी आणि विद्यार्थी-प्रतिनिधी कु. विनिता हासे हिने वर्षभर सहकार्य केले.

या शैक्षणिक वर्षातील जिमखाना विभागाची कामगिरी थोडक्यात पुढीलप्रमाणे. :-

१) हॅण्ड बॉल (मुले) - अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर येथे दि. ३-४ ऑगस्ट २००५ रोजी झालेल्या हॅण्ड-बॉल स्पर्धेत सहभागी झालेल्या आमच्या संघाने उपान्त्य फेरीपर्यंत मजल मारली .

२) हॅण्ड-बॉल (मुली) -अकोले येथे (आपल्याच महाविद्यालयात) दि. ५ ऑगस्ट २००५ रोजी झालेल्या हॅण्डबॉल स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील महिलांचा (सॉरी,मुलींचा) संघ गतवर्षीप्रमाणेच विजयी



*एकाग्रता हे यशाचे/सामर्थ्याचे रहस्य आहे.* **– राल्फ इमर्सन.**

झाला.परिणामी, पुणे विद्यापीठ पातळीवरील आंतरविभागीय स्पर्धेत सहभागी झालेल्या अहमदनगर जिल्हा क्रीडा विभागाच्या महिला संघामध्ये कु. सुनिता नवले, कु. विनिता हासे, कु. रोहिणी पापळ, कु.अर्चना क्षीरसागर,कु. रूमाणा शेख, कु. राजश्री खैरनार, कु. स्वाती तळेकर व कु. तेजश्री फापाळे या आठ खेळाडूंची निवड झाली होती. पुढे नाशिक येथे झालेल्या या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल कु.सुनिता नवले व कु. अर्चना क्षीरसागर (गोली) यांची निवड होऊन त्या २१-२९ जानेवारी २००६ या काळात आण्णा मलई विद्यापीठ,चिदंबरम (तामिळनाडू) येथे झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या.

३) मल्लखांब :- पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर येथे दि. ८/८/२००५ रोजी झालेल्या मल्लखांब स्पर्धेत श्री विजय भोईर हा खेळाडू उतरला होता. परंतु 'खडी झाप' या मल्लखांब प्रकारात दुखापत झाल्याने तो पुढे आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेत निवड होऊनही भाग घेऊ शकला नाही. दुर्दैव ! ईश्वरेच्छा बलीयसी । दुसरे काय ?

४) क्रॉस कंट्री (मुले) : राजूर (अकोले) येथील महाविद्यालयात दि.३० जुलै २००५ रोजी झालेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत सहभागी झालेल्या तीन खेळाडूंपैकी श्री रंगनाथ मडके याने तृतीय क्रमांक मिळविला. परिणामी, अहमदनगर जिल्हा क्रीडा विभागाच्या संघात आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी त्याची निवड झाली होती.

५) बास्केटबॉल (मुली) : पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर येथे दि. ६ सप्टेंबर २००५ रोजी झालेल्या बास्केटबॉल स्पर्धेत सहभागी झालेल्या आठ मुलींच्या संघाने उपान्त्य फेरीपर्यंत मजल मारली. परिणामी, पुणे विद्यापीठ पातळीवरील आंतरविभागीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा विभागाच्या संघात कु. सुनिता नवले, कु. रोहिणी पापळ, कु. राजश्री खैरनार व कु. स्वाती तळेकर या चार खेळाडूंची निवड झाली होती.

६) ॲथलेटिक्स : न्यु लॉ कॉलेज, अहमदनगर येथे दि. २१-२३ ऑक्टोबर २००५ रोजी झालेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये आमच्या खेळाडूंनी मिळविलेले यश पुढीलप्रमाणे -

अ) श्री. रंगनाथ मडके १) हाप मॅरॅथॉन (२१.१ कि.मी.) मध्ये प्रथम क्रमांक<br>२) १० हजार मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक

ब) श्री. विजय पवार - १०० मीटर धावणेमध्ये तृतीय क्रमांक

क) कु. रोहिणी पापळ - ४०० मीटर धावणेमध्ये प्रथम क्रमांक

या विद्यार्थ्यांची पुढे पुणे विद्यापीठ पातळीवरील ॲथलेटिक्स स्पर्धांसाठी अहमदनगर जिल्हा क्रीडा विभागाच्या संघात निवड झाली होती.

७) हॅण्डबॉल (मुली) (राज्यस्तरीय स्पर्धा) : परभणी येथे दि. २७ ते २९ ऑक्टोबर २००५ रोजी झालेल्या 'महाराष्ट्र राज्य खुल्या' हॅण्डबॉल संघात कु. सुनिता नवले, कु.वनिता हासे व कु. स्वाती तळेकर या ३ विद्यार्थिनींची निवड झाली होती.



*अस्वच्छता ही शारीरिक अशुद्धता आहे, अशांतता ही मानसिक अशुद्धता आहे तर अनियमितपणा ही बौद्धिक अशुद्धता आहे.* **– बुध्द.**


८) क्रॉस कन्ट्री (राज्यस्तरीय स्पर्धा) :- पुणे येथे दि. १७ जानेवारी २००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य खुल्या क्रॉस कन्ट्री स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघात श्री योगेश सदगीर, श्री. शंकर मोखरे व श्री.रंगनाथ मडके या इ. विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

९) राष्ट्रीय मैदानी स्पर्धा (National Para Olympiad) : बंगलोर येथे दि. २० फेब्रुवारी २००६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय वैयक्तिक मैदानी स्पर्धांमध्ये ४०० व ८०० मीटर धावणे स्पर्धांसाठीच्या महाराष्ट्र राज्य संघात श्री योगेश सदगीर याची निवड झाली आहे.या विद्यार्थ्याचे मन:पूर्वक अभिनंदन !

१०) मल्लखांब (राज्यस्तरीय) स्पर्धा : - अंधेरी, मुंबई येथे दि. १० ते १४ डिसेंबर २००५ महाराष्ट्र राज्य खुल्या मल्लखांब स्पर्धेसाठी श्री विजय भोईर या खेळाडूची अहमदनगर जिल्हा मल्लखांब संघात निवड झाली होती. याशिवाय बुद्दीबळ (मुले व मुली), टेबल टेनिस (मुले) क्रिकेट (मुले) या सांघिक स्पर्धांसाठी संघ तयार करून बाहेरगावी पाठविण्यात आले; तसेच वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.त्यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पंच व सरपंच म्हणून काम पाहिले. जिमखाना विभागातील अद्ययावत व्यायामशाळा दुपारी ३ ते सायम् ६ या वेळात आजी-माजी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली व येते.

## राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.)

४



चालू शैक्षणिक वर्षी ३९ मुले व १४ मुली अशा एकूण ५३ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र सेना यूनिटमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. **अंडर ऑफिसर** म्हणून **श्री.मनोज देशमुख व विद्यार्थी मंडळातील रा.छा. सेना-प्रतिनिधी सार्जंट कु. सुवर्णा शिंदे** यांनी वर्षभर उत्कृष्ट नेतृत्व केले.

मा. प्राचार्य श्री रमेशचंद्र खांडगे यांचे हस्ते स्वातंत्र्य व प्रजासत्ताकदिनी राष्ट्रध्वज फडकविण्यात आल्यानंतर छात्रांनी शानदार संचलन केले. याप्रसंगी अ.ता.ए.सोसायटीचे अध्यक्ष मा. विठ्ठलराव चासकर व सेक्रेटरी मा.ॲड्.श्री. किसनराव हांडे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय छात्र सेना-यूनिटची यावर्षीची कामगिरी पुढील प्रमाणे :-

(१) जी.व्ही.मालवणकर शूटिंग चॅम्पियनशीप कॉंपिटिशन -

अहमदरनगर येथे दि.१२ एप्रिल २००५ रोजी झालेल्या या स्पर्धेत १० छात्र (६ मुली व ४ मुले) सहभागी झाले.उत्कृष्ट फायटर म्हणून सार्जंट सुवर्णा शिंदे,कार्पोरल कु.राजश्री खैरनार,कॅडेट कु.सुनिता नवले व कॅडेट कु.तेजश्री आढाव या चार मुली व गतवर्षीचा अंडर ऑफिसर श्री.निरंजन बोऱ्हाडे या सर्वांनी अंतिम फेरी पर्यंत मजल मारली.

(२)नॅशनल कॅम्प्स-

५ राष्ट्रीय कॅम्पमध्ये १० छात्रसैनिक सहभागी झाले व त्यांनी तेथील प्रशिक्षण पूर्ण केले.त्याचा तपशील पुढील प्रमाणे :-

अ) नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प,(कन्नड, जि.औरंगाबाद) दि.१ ते १५ जून २००५, सहभाग: सार्जंट श्री धनंजय भोंगळे

ब) ऑल इंडिया ट्रेकिंग एक्स्पिडिशन (फ्लॉवर व्हॅली, डेहराडून, उत्तरांचल) दि.१८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २००५. सहभाग- अंडर ऑफिसर श्री मनोज देशमुख व कॉर्पोरल श्री मुजफ्फर शेख.

क) नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प (संबळपूर-बेलपहार, ओरिसा) दि.८ ते २० ऑक्टोबर २००५. सहभाग- सार्जंट श्री.अमोल चव्हाण व सार्जंट कु. सवर्णा शिंदे.

ड) शिवाजी ट्रेल ट्रेक (कोल्हापूर) दि. २२ नाव्हेंबर ते ५ डिसेंबर २००५. सहभाग- कॉर्पोरल श्री.निखिल एखंडे.चार राज्यातून आलेल्या १२६ छात्रांचे आपल्या महाविद्यालयातील प्रा.मेजर बी. आर. शिंदे यांनी नेतृत्व केले, ही अभिमानास्पद बाब होय.

इ) आर्मी अटॅचमेंट कॅम्प (अहमदनगर) दि. १९ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २००६. भारतीय सेनादलासोबत हा कॅम्प झाला. सहभाग- सार्जंट श्री. हौशीराम माघाडे व कॉर्पोरल श्री. प्रशांत जाधव.

(३) ग्रुप सिलेक्शन कॅम्प(औरंगाबाद)- दि. ९ ते २० जुलै २००५. महाराष्ट्रातील ८ जिल्हयांचा सामावेश असलेल्या या कॅम्प मध्ये ५ छात्र सहभागी होऊन त्यांनी तेथील प्रशिक्षण पूर्ण केले.

(४) ग्रुप सिलेक्शन कॅम्प क्र.३ (औरंगाबाद) दि.१९ ते ३० जुलै २००५. सहभाग- ५ मुले व ४ मुली. प्रशिक्षण यशश्वीपणे पूर्ण.

(५) ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प क्र.४ (वालमी औरंगाबाद) दि.१ ते १२ ऑगष्ट २००५. सहभाग- १२ छात्र, प्रशिक्षण यशश्वीपणे पूर्ण.

(६) ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प क्र.६ (वालमी औरंगाबाद) दि.३ ते १४ सप्टेंबर २००५. सहभाग- ४ छात्र.प्रशिक्षण यशश्वीपणे पूर्ण.

(७) ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प क्र.८ (वालमी औरंगाबाद) दि.१५ ते २६ सप्टेंबर २००५. सहभाग- ३ छात्र.प्रशिक्षण यशश्वीपणे पूर्ण.

(८) ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प क्र.९ (वालमी औरंगाबाद) दि.२७ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २००५. सहभाग-३ छात्र.प्रशिक्षण यशश्वीपणे पूर्ण.

(९) ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प (लातूर) : दि.१० ते २१ डिसेंबर २००५. या कॅम्पमध्ये आपल्या यूनिटमधील ८ कॅडेट्सची निवड झाली. परेड कमांडर म्हणून अंडर ऑफिसर श्री. मनोज देशमुख याने तेथील कवायत स्पर्धेचे नेतृत्व केले. ग्रुप कमांडर कर्नल श्री.डी.डी.शर्मा यांचे पायलट म्हणून सार्जंट श्री.अमोल चव्हाण व सार्जंट श्री. हौशीराम माघाडे यांनी संचलन केले.



*जनतेच्या चारित्र्यावर देशाची प्रगती अवलंबून असते.*
*देशात कोणते सरकार आहे याला फारसे महत्त्व नाही.*– **सॅम्युएल जॉन्सन.**

(१०) ॲन्युअल इन्स्पेकशन (भेट पाहणी) :

अ) लेफ्टनंट कर्नल श्री. भालसिंग यांनी आपल्या युनिटला दि.५ मार्च २००५ रोजी भेट दिली. छात्रांनी त्यांना मानवंदना दिली.

ब) लेफ्टनंट कर्नल श्री. पोळ यांनी ०४ ऑक्टोबर २००५ रोजी आपल्या यूनिटला भेट देऊन छात्रांना मार्गदर्शन केले. छात्रांनी उत्कृष्ट संचलन करून त्यांना मानवंदना दिली.

क) लेफ्टनंट कर्नल श्री. शर्मा (अहमदनगर) यांनी १९ जानेवारी २००६ रोजी आपल्या एन्.सी.सी.यूनिटला भेट दिली. छात्रांनी त्यावेळी उत्कृष्ट कॉन्टिंजंट ड्रिल सादर करून त्यांना मानवंदना दिली. अ.ता.ए.सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. विठ्ठलराव चासकर यांचे हस्ते व मा.प्राचार्य श्री. रमेशचंद्र खांडगे यांच्या उपस्थितीत त्यांचा शाल श्रीफळासह सत्कार करण्यात आला.

(११) सन्मान गार्ड परेड -

मा. नामदार श्री. दिलीप वळसे पाटील, ऊर्जा व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य ,दि. २३ जानेवारी २००६ रोजी महाविद्यालयात आले होते. त्यावेळी माजी मंत्री व अ.ता.ए.सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त श्री.मधुकररावजी पिचड व इतर मा.पदाधिकारी उपस्थित होते. छात्रांनी त्यांना मानवंदना दिली.

(१२) सेनादलात छात्रांची भरती-

२००५ साली आपल्या युनिटमधील पुढील चार कॅडेट्स भारतीय सेनादलात दाखल झाले-

१) कॅडेट श्री. दातीर आर.एस.( बी.एस्.एफ.)

२) कॅडेट श्री. संदीप ताजणे ( बी.एस्.एफ.)

३) कॅडेट श्री. विलास उघडे (आर.पी.एफ.)

४) कॅडेट श्री. रंजित कोटकर (ई.एम.ई.)

(१३) विशेष सत्कार -

अ.ता.ए.सोसायटीचे मा. पदाधिकारी व दुधगंगा पतसंस्था, अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या **यूनिटचे अधिकारी मेजर प्रा.बी.आर.शिंदे,** अंडर ऑफिसर श्री.मनोज देशमुख व इतर ७ छात्र सैनिक अशा एकूण १० व्यक्तींचा त्यांच्या कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला.


(१४) प्रमाणपत्र परिक्षा-

**'बी' प्रमाणपत्र** (मुली ०८ आणि मुले ०७) एकूण १५ कॅडेटस्नी परीक्षा दिली त्यात १००% कॅडेटस् उत्तिर्ण झाले आहेत.

**'सी' प्रमाणपत्र** एकूण ०७ कॅडेटस्नी परीक्षा दिली त्यात १००% कॅडेटस् उत्तिर्ण झाले, त्यापैकी ४ कॅडेटस्ला **'बी'ग्रेड** संपादन करण्यात यश मिळालेले आहे.

मा. प्राचार्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख प्रा.मेजर बी.आर.शिंदे यांनी केला आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)



'जिथे कष्ट उपसायची तयारी असते तिथे नवनिर्मितीची खात्री असते.' हा ज्ञानयुक्त श्रमसंस्कार करणारी एक योजना म्हणून राष्ट्रीय सेवा योजना उच्च शिक्षणक्षेत्रात उत्तरोत्तर अधिक जोमाने कार्य करीत आहे. आमच्या महाविद्यालयात देखील गेल्या अनेक वर्षांपासून ही योजना डोळ्यात भरण्याजोगे काम करीत आहे.

रा.से.योजनेची यूनिटसंख्या दोन असून १३८ मुले ११२ मुली असे एकूण २५० विद्यार्थी यावर्षी या योजनेत सहभागी झाले आहेत.जुलै २००५ मध्ये स्वयंसेवकांची निवड करण्यात आली.

**(१) नियमित कार्यक्रम-**

प्राचार्य श्री.रमेशचंद्र खांडगे यांचे हस्ते २ ऑगस्ट २००५ रोजी रा. से. योजनेच्या नियमित कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.त्यानंतर दि.९-१० ऑगस्ट रोजी **मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेश मालुंजकर** यांनी विद्यार्थी -स्वयंसेवकांचे उद्‌बोधन केले.स्वयंसेवकांची ५ गटात विभागणी करून सोमवार ते शनिवार (गुरूवार वगळून) महाविद्यालय परिसरात श्रमदान घेण्यात आले.विशेष कार्यक्रम म्हणून ९ ऑगष्ट 'क्रांतीदिन',५ सप्टेंबर 'शिक्षक दिन', ८ सप्टेंबर 'आंतरराष्टीय साक्षरता दिन',२४ सप्टेंबर 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' व २ ऑक्टोबर गांधी जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

**(२) आपत्ती व्यवस्थापन कक्ष-**

पुणे विद्यापीठाच्या सूचनेनुसार यावर्षी आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला.त्याअंतर्गत १७ सप्टेंबर २००५ रोजी म्हणजे गणेश विसर्जनाचे दिवशी या कक्षाने 'अकोले पॅटर्न' नावाची एक अभिनव योजना अंमलात आणली.या कक्षातील इतर स्वयंसेवकांनी या दिवशी नदीकिनारी जाऊन नदीत विसर्जित केल्या जाणाऱ्या १००० गणेश मूर्ति व निर्माल्य ताब्यात घेऊन त्यांचे महाविद्यालयातील विहिरीत विधिपूर्वक विसर्जन केले. परिणामी, नदीचे पाणी प्रदूषित होणे टळले व निर्माल्याचा उपयोग महाविद्यालयातील गांडूळखत प्रकल्पासाठी करण्यात आला. २४ सप्टेंबर २००५ यांचे हस्ते करण्यात आले.

**(३) विशेष हिवाळी शिबीर-**

दि. २० ते २९ नोव्हेंबर २००५ या कालावधीत रा.से.योजनेचे विशेष हिवाळी शिबीर आऊबाई मंदिर, मौ.वाघापूर, ता.अकोले येथे संपन्न झाले. या शिबिरात ७९ मुले व ४६ मुली व ५ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

या शिबिरात स्वयंसेवकांनी १० दिवसात ३५०० मीटर (३.५ कि.मी.) लांबीचे सलग समपातळी चर (सी.सी.टी.) आणि ८०० मीटर लांबीचा ' आऊबाई मंदिर ते मन्याळे ' असा घाट रस्ता तयार केला.सदर कामाचे मुल्य अंदाजे १ लाख १० हजार रूपये आहे.

'मी एक तर रस्ता शोधेन नाहीतर स्वत:चा रस्ता तयार करेन', हा मार्गदर्शक विचार २००३-२००४ या



*सुख हे केवळ सद्‌गुणांपासूनच मिळू शकते. सर्व सद्‌गुणांचा पाया सत्य हाच आहे.* **– कोलरिज.**

शैक्षणिक वर्षाच्या रा.से.याजनेच्या अहवालारंभी मार्गदर्शक सूत्र म्हणून उद्धृत केला होता.या वर्षी तो सत्यसृष्टीत उतरला, त्याबद्दल सानंद समाधान व्यक्त करत आहोत.

पुणे विद्यापीठाच्या बी.सी.यू.डी.च्या संचालिका श्रीमती नयना निमकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाल; तर,मा.डॉ.सौ.राजलक्ष्मी कोळस्कर व पुणे विद्यापीठ रा.से.योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ.श्री. संजय चाकणे यांच्या उपस्थितीत या शिबिराचा समारोप झाला.

या शिबिरात आजच्या पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष मा.श्री.सुरेशराव कोते, कार्यकारी संचालक,श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड, पुणे,अ.ता.ए.सोसायटीचे विश्वस्त मा.श्री.भाऊसाहेब हांडे व डॉ.बी.जी.बंगाळ,अध्यक्ष श्री. विठ्ठलराव चासकर, सेक्रेटरी ॲड.के.बी.हांडे व वाघापूरचे सरपंच श्री.भाऊसाहेब बराते यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

**(४) रक्तदान शिबीर-**

दि.२३ डिसेंबर २००५ रोजी प्रवरा वैद्यकी य महाविद्यालय, लोणी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. एकूण ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

**(५) युवा सप्ताह-** दि. १२ ते १९ जानेवारी २००६ या कालावधीत युवा सप्ताह निमित्त वादविवाद, वक्तृत्व, निबंधलेखन, भित्तीपत्रक व सामान्य ज्ञान या स्पर्धा घेण्यात आल्या.

**(६) कार्यक्रम अधिकाऱ्यांचा सहभाग -**

प्रा.यासीन सय्यद-

१) ८ ऑगष्ट २००५ रोजी राजूर,महाविद्यालय राजूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय कार्यक्रमअधिकारी सभेत सहभाग.

२) २४ ऑगष्ट २००५ रोजी राजूर, महाविद्यालय राजूर येथे झालेल्या 'आपत्ती व्यवस्थापन' कार्यशाळेत सहभाग.

३) २२ डिसेंबर २००५ रोजी संगमनेर येथे झालेल्या 'राष्ट्रीय एकात्मता शिबीर' - पूर्व नियोजन बैठकीत सहभाग.

प्रा.किरण जाधव-

१) २४ जून २००५ रोजी 'यशदा' पुणे आयोजित आपत्ती व्यवस्थापण कार्यशाळेत सहभाग.

२) २६ जून २००५ रोजी पुणे विद्यापीठात झालेल्या रा.से.योजना कार्यक्रम अधिकारी सभेत सहभाग.

प्रा.कु.अर्चना नगरे-

१) २० सप्टेंबर २००५ रोजी सिन्नर येथे झालेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत सहभाग.

**(७) स्वयंसेवकांचा सहभाग-**

* श्री.कासार संदेश दशरथ (एस्.वाय.बी.एस्सी.)-

अ) पुणे ते पंढरपूर, विद्यापीठस्तरीय वृक्ष दिंडी व स्वच्छता अभियानात सहभाग (दि.३० जून ते १८ जुलै २००५)

ब) राजूर महाविद्यालय राजूर येथे झालेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत सहभाग (दि.८ ऑगस्ट २००५)

क) पुणे विद्यापीठाच्या 'एडस नियंत्रणात विद्यार्थांची भूमिका' या विषयावरील निबंध व वक्तृत्व स्पर्धेत सहभाग (दि. ४ फेब्रुवारी २००६)

* कु. पाबळकर स्नेहल लक्ष्मण (एस्.वाय.बी.एस्सी) -

अ) सिन्नर येथे झालेल्या आपत्ती व्यवस्थापण कार्यशाळेत सहभाग (दि.२० सप्टेंबर २००५)

ब) पुणे विद्यापीठाच्या 'एड्स नियंत्रणात विद्यार्थ्यांची भूमिका' या विषयावरील निबंध व वक्तृत्व स्पर्धेत सहभाग

* श्री.म्हस्के सचिन बबन (एस्.वाय.बी.ए.)-

अ) चाडगांव, श्रीगोंदा येथे झालेल्या जिल्हास्तरीय 'सलग समपातळी चर पुर्नभरण शिबिरात' सहभाग (दि.९ ते ११ ऑगष्ट २००५)

ब) पुणे विद्यापीठाच्या प्रजासत्ताक दिन संचलन निवड चाचणीत सहभाग (दि.१५ ऑक्टोबर २००५)

क) पाटोदा, बीड येथे झालेल्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन शिबिरात सहभाग (दि. ६ ते १२ नोव्हेंबर २००५)

ड) मुंबई येथे राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनात सहभाग (दि. १६ ते २६ जानेवारी २००६)

* कु.घोलप रूपाली रमेश (एस्.वाय.बी.ए.)-

अ) पुणे विद्यापीठाच्या प्रजासत्ताक दिन संचलन निवड चाचणीत सहभाग (दि.१५ ऑक्टोबर २००५)

ब) गुजरात व दमण येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन पूर्व शिबिरात-दुसऱ्या फेरीत सहभाग (दि.१७ ते २९ ऑक्टोबर २००५)

* कु.गोडसे अश्विनी रोहिदास (टी.वाय.बी.ए.)-

अ) कडा, अष्टी, जि.बीड येथे झालेल्या राज्यस्तरीय हागणदारीमुक्त गाव अभियान शिबिरात सहभाग (दि.१० ते १६ नोव्हेंबर २००५)

* श्री.नाईकवाडी श्रीकांत परबत (एस.वाय.बी.ए) व श्री.पाटील प्रविण श्रीराम (एस्.वाय.बी.एस्सी.)-

चाडगाव, श्रीगोंदा येथे झालेल्या जिल्हास्तरीय सलग समपातळी चर पुर्नभरण शिबिरात सहभाग.

* श्री.पोखरकर संदिप वाळीबा (एस्.वाय.बी.ए.)-

अ) राजूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत सहभाग (दि.८ ऑगष्ट २००५)

ब) केळगाव आळंदी, जि.पुणे. येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय स्वच्छता व आरोग्य शिबिरात सहभाग (दि.२२ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २००५)

* श्री. मंडलिक हेमंत रामनाथ (एस.वाय.बी.ए)-

अ) केळगाव आळंदी, जि.पुणे. येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय स्वच्छता व आरोग्य शिबिरात सहभाग (दि.२२ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २००५)

* श्री. शेळके शामसुंदर नरहरी (एस्.वाय.बी.ए.) व कु.देशमुख रूपाली (एस्.वाय.बी.ए.)-

संगमनेर येथील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात येथे झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभाग दि.०५ ते १२ जानेवारी २००६

* श्री.रसाळ गोविंद खंडु (एस्.वाय.बी.ए.) व श्री. शाह संदिप दिलीप (टी.वाय.बी.एस्सी.) भीमाशंकर,ता.जुन्नर येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय पर्यावरण जागृती शिबिरात सहभाग (दि.२९ते३१ जाने २००६)


मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, **विद्यार्थी प्रतिनिधी श्री. संदिप शाह व विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. स्नेहल पाबळकर** यांना श्री. वसंत जेडगुले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## कला मंडळ ६



स्नेहसम्मेलनाचे निमित्त वार्षिक स्पर्धा म्हणून हिंदी व मराठी गीतगायन व अभिनय स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी **अध्यक्ष प्रा.डॉ.मोहनकुमार बारगजे** यांना सदस्य प्रा.डॉ.सौ.ए.एम्.शेख, प्रा.बी .एम्. महाले व प्रा.एम्.डी.बाणाईत यांचे सहकार्य लाभले.

## वाङ्मय मंडळ ७



श्री.विं.दा.करंदीकर यांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाल्यामुळे त्यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.श्री.नंदकुमार रासने यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.याशिवाय वार्षिक स्पर्धा म्हणून कथालेखन, काव्यलेखन व काव्यगायन स्पर्धांचे आयोजन करण्यात **अध्यक्ष प्रा.बी.एम्.महाले** यांना सदस्य प्रा.सौ.आर.एम्.बारगजे व प्रा.एस्.जी.मोरे यांनी सहकार्य केले.

## वादविवाद मंडळ

८



आंतरमहाविद्यालयीन व राज्यस्तरीय वादविवाद व वक्तृत्व स्पर्धांसाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे संघ तयारी पूर्वक पाठविण्यात आले. स्नेहसंमेलनानिमित्त उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा व 'प्रेम अव्यारव्येय आहे' या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उदंड उत्साह व प्रचंड प्रतिसाद यामुळे मा. प्राचार्य श्री. रमेशचंद्र खांडगे व विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष प्रा.साहेबराव गायकवाड यांच्या उपस्थितीत वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.परीक्षक म्हणून प्रा.डॉ.विजय भगत, प्रा.डॉ.एस.बी.खेमनर, प्रा.संजय मोरे व सोपानराव साळवे यांनी तसेच सदस्य म्हणून प्रा.बी.बी.देशमुख यांनी अध्यक्ष **प्रा.डॉ.विजय बाणकर** यांना सहकार्य केले.

सातारा येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात दि. २३ ते २५ जानेवारी २००६ रोजी झालेल्या कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत **श्री. प्रविण शेटे** (तृतीय वर्ष वाणिज्य) या विद्यार्थ्यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. सदर संस्थेने त्याला प्रमाणपत्र, बक्षीस रक्कम रुपये ७५१/- व स्मृतीचिन्ह प्रदान केले. (या स्पर्धेत एकूण १६२ स्पर्धक सहभागी झाले होते.)

## इंग्रजी वाङ्मय मंडळ

९



चालू शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रात प्रा. नंदकुमार रासने यांचे हस्ते मंडळाचे उद्घाटन झाले. इंग्रजी भाषा व साहित्याला वाहिलेल्या ''रॅम्बलिंग्ज'' या अर्ध वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. पुणेस्थित इंग्लीश लँग्वेज ॲकॅडमीचे प्रा. अँथनी थॉमस यांचे 'स्पोकन इंग्लीश' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

द्वितीय सत्रात नववर्षाच्या स्वागता निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ''रॅम्बलिंग्ज'' च्या दुसऱ्या अंकाचे प्रकाशन मा.प्राचार्य श्री.रमेशचंद्र खांडगे यांचे हस्ते करण्यात आले.

मंडळाच्या कार्यक्रमांना विभाग प्रमुख असलेले मा.प्राचार्य यांचे मार्गदर्शन व विभागातील इतर शिक्षकांचे सहकार्य लाभले असे इंग्लीश लिटररी असोसिएशनचे अध्यक्ष प्रा.संजय पगारे यांनी नमूद केले आहे.



*Life is the art of drawing sufficient conclusions from in sufficient premisses.* **- Butler.**

## सामाजिक समता मंडळ
### १०



'सामाजिक समता' या विषयावरील चर्चासत्रात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे चर्चा केली. मानवनिर्मित विषमता नष्ट झाल्याशिवाय सामाजिक समता निर्माण होणे अशक्य आहे, असा या चर्चासत्राचा सारांशात्मक सूर होता.स्नेहसम्मेलनानिमित्त **अध्यक्ष प्रा.डॉ.विजय शेडगे** यांनी निबंध लेखन व स्पर्धेचे आयोजन केले.

## वाणिज्य मंडळ
### ११



वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना नवविचार व नवा दृष्टिकोन देण्याच्या हेतूने वाणिज्य मंडळाचे **अध्यक्ष प्रा.आर.जी.देशमुख** यांनी पुढील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन केले :-

१) मंडळाचे उद्‌घाटन करून श्री.म.टा.पाटस यांनी 'संगणक शिक्षणाची गरज' स्पष्ट केली.

२) 'इंडस्ट्रियल कॉम्प्युटर अकौंटंट'या कलकत्ता-निवासी संस्थेचे औरंगाबाद येथील 'डिव्हीजन इन्चार्ज' श्री.काळे साहेब यांचे व्याख्यान आयोजित केले.त्यानंतर महाविद्यालयात 'आयसीए' सेंटर सुरू करण्यात आले.या संस्थेतर्फे १२ महिन्यामध्ये संगणक विषयक शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीची हमी दिली जाते. २० विद्यार्थ्यांना पहिल्या बॅचचे शिक्षण सध्या चालू आहे.

३) कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.ए.टी.देशमुख सेवानिवृत्त झाले. वाणिज्य विभागाचे वतीने त्यांना निरोप देण्यात आला.'शिक्षक कधीही निवृत्त होत नाही.'असे निरोप-समारंभी एका विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले.

४) प्रा.एस्.झेड देशमुख यांनी ६१ व्या वर्षात पदार्पण केले त्याप्रीत्यर्थ विद्यार्थांनी पुढाकार घेऊन विचार विनिमय कार्यक्रम आयोजित केला.

## विज्ञान मंडळ
### १२



'गणित व मनोरंजन' या विषयावर मा.श्री.उत्तमचंद चोरडिया यांचे ज्ञानवर्धक व मनोरंजक व्याख्यान आयोजित करण्यात आले. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या साहित्य कलागुणांना वाव देण्यासाठी विज्ञान कथा स्पर्धा घेण्यात आली.या वर्षीचा नवा उपक्रम म्हणून 'क्युरिऑसिटी कॉर्नर'या सदरांतर्गत विद्यार्थ्यांकडून कुतुहलजनक प्रश्नोत्तरे मागविण्यात आली.मंडळाच्या सर्व कार्यक्रमात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे तसेच मा.प्रा.बाळासाहेब मेहेत्रे व प्रा. भाऊसाहेब भांगरे यांनी **अध्यक्ष प्रा.अशोक दातीर** यांना सहकार्य केले.



*प्रखर बुद्धिमत्तेपेक्षा शुद्ध चारित्र्य हे श्रेष्ठ आहे.* **– सर विल्यम् अर्ल.**

## बहि:शाल शिक्षण मंडळ

१३



या मंडळाचे एक केंद्र आपल्या महाविद्यालयात बऱ्याच वर्षापासून कार्यरत आहे. **केंद्र कार्यवाह प्रा. यासीन सय्यद** यांनी मौजे वाघापूर ता.अकोले येथे दि.२३ ते २५ नोव्हेंबर २००५ या कालावधीत डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन केले.तिचा तपशील पुढील प्रमाणे-

१) प्रा.बी.एन्.शिंदे,हवामान शास्त्रज्ञ व प्रमुख,भुगोल विभाग,अहमदनगर कॉलेज, विषय - महाराष्ट्रातील पाणी नियोजन .

२) डॉ.के.एन्.धुमाळ, प्रमुख, वनस्पती शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, विषय -जैवतंत्रज्ञान व भारतीय शेती.

३) श्री.शाम भालेराव, संपादक, **सकाळ(पुणे आवृत्ती)**, पुणे,विषय- संभाषन कौशल्य.

प्रा. संजय मोरे यांनी केंद्र कार्यवाह प्रा.सय्यद यांना बहुमोल सहकार्य केले.

## विद्यार्थी आरोग्यसेवा योजना

१४



प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गातील एकूण ६०० विद्यार्थ्यांची सक्तीची वैद्यकीय तपासणी दि.२३/०९/२००५ रोजी करण्यात आली.४९ विद्यार्थ्यांच्या ठिकाणी डोळे, दात, व त्वचाविषयक सर्वसामान्य रोग आढळून आले.तज्ञ डॉक्टरांनी त्यांना मार्गदर्शन केले.

दि.२०/१२/२००५ रोजी आपले महाविद्यालय व प्रवरा मेडीकल कॉलेज,लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.एकूण ४० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

आरोग्यसेवा योजने अंतर्गत डॉ.एस्.जी.बंगाळ सनद आरोग्य अधिकारी म्हणून काम पाहतात.प्रत्येक बुधवारी ते महाविद्यालयाच्या आरोग्य विभागात विद्यार्थी व कर्मचारी यांना आरोग्य सेवा देतात.आरोग्य तपासणी कार्यात अकोले शहरातील सर्व डॉक्टरांनी मोलाचे सहकार्य केले.त्याबद्दल आरोग्य सेवा योजना प्रमुख प्रा.अभिमन्यु केदार व सभासद प्रा.सौ.रजनी बारगजे, प्रा.बाळासाहेब देशमुख,प्रा.कु.अर्चना नागरे व प्रा.संजय मोरे यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## कमवा व शिका योजना

१५



यावर्षी या योजनेमध्ये एकूण ५० गरीब व होतकरू विद्यार्थी सहभागी झाले आहेत. मुलींच्या संख्येत वाढ ही लक्षणीय बाब होय.महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे,कार्यालय व ग्रंथालयाची विविध कामे,या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी केली.मा.प्राचार्यांचे मार्गदर्शन व प्रा.विजय शेडगे यांचे सहकार्य योजना प्रमुख **प्रा.डॉ.एस्.बी.खेमनर** यांनी नमूद केले आहे .



*छोट्या छोट्या गोष्टींनी सुरुवात केली तरच मोठमोठी ध्येये गाठता येतात.*

## विवेकवाहिनी
१६



विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव व विवेकी मुल्य विचार रूजविण्यासाठी विवेकवाहिनी कार्यरत असते.सहभागी विद्यार्थी दर आठवड्याला एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक व वैयक्तिक विषयांवर विचारविनिमय करतात.

**विद्यार्थ्यांनी अहवाल वर्षात**

(१) बालमजूर, हुंडाबळी, आपत्ती इ.संवेदनक्षम विचारांवर चर्चा केली.

(२) व्यक्तिमत्त्व विकास,माणुसकी व माणुसकीचा देखावा या विषयांवर आपली मते मांडली.

(३) अनेक विषयांवर वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न केला.

(४) वाचनाची आवड विकसित होऊन पूरक वाचनाची सवय होण्यासाठी काही पुस्तके व दैनिकांमधील लक्षवेधी लेख वाचण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यात आले.आणि

(५) ३१ डिसेंबर २००५ रोजी वाहिनीच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात व्यसनमुक्ती, स्त्रियांचे प्रश्न इ.समस्यांवर भित्तीपत्रकाचे प्रदर्शन करून इतर विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले,असे **कार्याध्यक्ष प्रा.डॉ.विजय भगत** यांनी नमूद केले आहे.

## सहल विभाग
१७



जीवनातल्या आनंदाचे इंगित हे जीवनाबाबतच्या उत्सुकतेत दडलेले आहे.म्हणून या शैक्षणिक वर्षीदेखील शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. तपशील पुढील प्रमाणे

१) विज्ञान विभाग : भंडारदरा, घाटघर प्रकल्प,औरंगाबाद
२) कला विद्याशाखेतील हिंदी विभाग - भिमाशंकर
३) कला विद्याशाखेतील इंग्रजी विभाग - पैठण,नेवासा
४) कला विद्याशाखेतील अर्थशात्र विभाग - श्रीवर्धन,हरेहरेश्वर
५) विज्ञान विद्याशाखेतील भूगोल विभाग - औरंगाबाद,वेरूळ-अजंठा, पैठण
६) विज्ञान विद्याशाखेतील तृतीय वर्ष विज्ञान - आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन,नाशिक

या शैक्षणिक सहलींचे नियोजनाबाबत **सहल विभाग प्रमुख प्रा.डॉ.एस्.बी.खेमनर** यांना प्रा. डॉ.विजय भगत यांचे सहकार्य लाभले.



*विचार न करता वाचत जाणे हे पचन न होता जेवण्यासारखे आहे.*

## परीक्षा विभाग

१८



विद्यापीठ नियमानुसार या शैक्षणिक वर्षी व्दितीय वर्ष कला व वाणिज्य या वर्गांनाही अंतर्गत मूल्यमापन सत्रांत परीक्षा सुरू करण्यात आली. परीक्षा विभागाचे पूर्ण संगणकीकरण करण्याचे काम सुरू आहे.इतर वर्गांची सत्रांत परीक्षा विद्यापीठ नियमानुसार घेण्यात आली.अध्यक्ष प्रा.एम्.डी. बाणाईत यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली परीक्षा विभागाचे सदस्य प्रा.यासीन सय्यद, प्रा.डॉ.विजय भगत, प्रा.डॉ.एस्.वी.खेमनर प्रा.कु.सातपुते व प्रा.कु.अर्चना नगरे आणि कार्यालयातील श्री राम गाडेकर व इतर कर्मचाऱ्यांनी परीक्षा विभागचे काम यशस्वीपणे पार पाडले म्हणून मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांनी **अध्यक्ष प्रा.बाणाईत** यांचे एका स्टाफ मीटिंगमध्ये मन:पुर्वक अभिनंदन केले.

## प्राध्यापक प्रबोधिनी

१९



स्टाफ अॅकॅडमीचे उद्घाटन मा.श्री.सुरेशजी कोते, कार्यकारी संचालक, श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड, पुणे. यांचे शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रा.किरण जाधव, प्रमुख,इतिहास विभाग,यांचे पाणिपतची शोकांतिका ' या विषयावर व्याख्यान झाले.या माहितीपूर्ण व्याख्यानास उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रा.संजय ताकटे यांनी सहकार्य केल्याने **अध्यक्ष प्रा.संजय पगारे** यांनी उल्लेखिले आहे.

## ग्रंथालय

२०



महाविद्यालयाचा आत्मा म्हणून ओळखले जाणारे ग्रंथालय आज माहिती तंत्रज्ञानाची बौध्दिक कार्यशाळा बनू पाहत आहे.ग्रंथालयात एकूण ४२६०० ग्रंथ आहेत.राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ६१ नियतकालिके व विविध विषयांवरील सी.डीज्. ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

**ग्रंथालयाचे विषेश उपक्रम -**

१)संगणकीकरण -विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंतर्गत विद्यापीठ सेंटर इनफ्लिबनेटने तयार केलेले रू.५०००० /-किंमतीचे ' सोल ' ( **SOUL** ) सॉफ्टवेअर घेतले आहे.ग्रंथालयातील सर्व कामकाज संघणकाद्वारे करण्यासाठीचे 'डेटाबेस'तयार करण्याचे काम चालू आहे.

२) बूक बँक योजना ३) ग्रंथ प्रदर्शन - २

४) कात्रण सेवा- वृत्तपत्रांतील विविध विषयांवरील लेखांची कात्रणे अभ्यासकांना /संशोधकांना उपयुक्त ठरतात म्हणून संग्रहित केली आहेत/जातात. ५) इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात आहोत.

६) करिअर गाईडन्स- स्पर्धा परीक्षांचे अद्यावत ग्रंथ, नियतकालिके, प्रश्नसंच, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जातात.



*दहा जन्मांचा अनुभव मी आत्ताच माझ्या वाचनाने गोळा केला आहे.*

मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शना नुसार **ग्रंथपाल श्री. अब्दुलरहेमान शेख** व त्यांचे सहकारी ग्रंथलय अधिकाधिक उपयुक्त ठरण्याच्या दिशेने कार्यरत आहेत.

## Department of Library.

- **Year of Establishment** :- 1974
- **Library Building** :- Area 4160 sq.ft.
- **Library Timing** :- 8:30 to 5:30.
- **Collection** :-
  - **A) Books :- Senior College -42,000**
  - **Junior College -8,000**
  - **B) Cd's** :- 52 (Audio & Vedio )
- **No of Users / Readers** :- 4500
- **Budget** :-
  - **A) Books** :- 1,20,000.
  - **B) Periodicals** :- 5,500.
- **Library & Information Science** :- 55
- **Sports** :-72
- **Reference Books** :-2000
- **Daily Reading Material**:-
- **Newspapers** :- 15
- **Magazines** :- 90
- **Library Facilites** :-

1) Reading Hall.
2) Home Lending.
3) Inter Library Loan.
4) Newspaper Cliping.
5) Periodicals & Newspaper.
6) Reference Service.
7) Open access service.
8) Local telephone facility.

**Subjectwise Collection :-**

| No. | Subject | Books | Periodicals |
|---|---|---|---|
| 1) | English | 6382 | 6 |
| 2) | Marathi | 8198 | 13 |
| 3) | Hindi | 6382 | 6 |
| 4) | Economics | 2316 | 3 |
| 5) | Politics | 1590 | 6 |
| 6) | History | 1344 | 1 |
| 7) | Geography | 1844 | 1 |
| 8) | Philosophy | 1250 | 2 |
| 9) | Chemistry | 2341 | 3 |
| 10) | Botany | 1250 | 1 |
| 11) | Zoology | 380 | 1 |
| 12) | Mathematics | 564 | 1 |
| 13) | Physics | 1779 | 3 |
| 14) | Commerce | 2986 | 6 |
| 15) | Accountancy | 1280 | - |
| 16) | Banking | 316 | - |
| 17) | Business Adminis-tration | 540 | - |

अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.अगस्त्य.

## विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार

२१




१९७७ पासून 'अकोले कॉलेज विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार मर्यादित' ही संस्था कार्यरत आहे.सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य विद्यार्थांना योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी हे भांडार चालवले जाते. महाविद्यालयाचे विद्यार्थी व सर्व कर्मचारी या संस्थेचे सभासद आहेत, असे **अध्यक्ष प्रा. सुरेश मालुंजकर** यांनी नमूद केले आहे.

## माहिती तंत्रज्ञान विभाग
२२



आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगाबरोबर आपल्या विद्यार्थ्यांनाही पुढे जाण्यासाठी सक्षम होता यावे म्हणून रू.१२ लाख खर्चून महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान शाळा तयार व सुरू केली आहे. ११ वी व १२ वी विज्ञान व वाणिज्य या वर्गांसाठी 'माहिती तंत्रज्ञान' हा विषय सुरू केला आहे.संगणकसंबधित विविध कोर्सेससाठी एकूण २१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. 'माहिती तंत्रज्ञान' अभ्यास क्रमासाठी महाराष्ट्र शासनाचे एम्.एस्.सी.आय.टी.चे परीक्षाकेंद्र महाविद्यालयाला मिळाले असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून संगणकविषयक विविध डिप्लोमा व कोर्सेसना मान्यता मिळाली असल्याचे **श्री. के.एस.गुंजाळ** यांनी नमूद केले आहे. श्री. एन.के.पठाण त्यांचेबरोबर या विभागात कार्यरत आहेत.

## एड्स जनजागृती मोहिम
२३



विज्ञान शाखेतील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने ही मोहिम राबविली जाते.महाविद्यालयीन जीवनात पदार्पण करणाऱ्या ११ वी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना वर्षभरात एड्सविषयक शास्त्रीय माहिती दिली जाते तसेच एड्सविषयक विविध स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

प्राणिशास्त्र विभागाचे **प्रमुख प्रा. के.बी.नाईकवाडी** यांनी एड्स या विषयावर - १) संगमनेर महाविद्यालय, संगमनेर. २) कन्या विद्यालय, अकोले. ३) राजापूर महाविद्यालय, राजापूर, (ता.संगमनेर) यांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात व्याख्याने दिली.

## हिंदी विभाग
२४



या विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर २००५ रोजी 'हिंदी दिवस समारोह' साजरा केला जातो. अहवाल वर्षीच्या या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे व हिंदी विभागाचे माजी विद्यार्थी व 'सी न्यूज' चे वार्ताहर श्री. सुभाष खरबस हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. रमेशचंद्र खांडगे यांच्या रसिकतापूर्ण उपस्थितीत काव्य वाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या विभागातर्फे भिमाशंकर सहलीचे आयोजन करण्यात आले, वार्षिक स्पर्धा म्हणून निबंधलेखन व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.

हिंदी विभागाचे विशेष उपक्रम म्हणजे माजी विद्यार्थ्यांनी दिलेल्या देणगीतून 'विभागीय ग्रंथालय' सुरू करण्यात आले. **विभागप्रमुख प्रा.डॉ.सौ.अकिला शेख** यांना हिंदी भाषा व साहित्याच्या विकासात्मक विविध योजना राबविण्याच्या कार्यात प्रा. साहेबराव गायकवाड यांचे वर्षभर सहकार्य लाभले व लाभते.



*करिअरच्या सुरुवातीला किती शिकता हे महत्त्वाचे, किती मिळविता हे नव्हे !*



## माजी विद्यार्थी संघटना

२५

महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात आली असून महाविद्यालयाचे व माजी विद्यार्थ्यांचे संबंध पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्याचा, वृध्दिंगत करण्याचा प्रयत्न केला जातो. सदर संघटना महाविद्यालयाच्या मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी साथ देते, असे **अध्यक्ष प्रा.डॉ.मोहनकुमार बारगजे** यांनी नमूद केले आहे.



## परिसर विकास

२६

महाविद्यालय परिसर व वनस्पती उद्यान स्वच्छ करणे व ठेवणे, विविध प्रकारच्या झाडांची व रोपांची लागवड करणे, त्यांची नियमित देखभाल करणे, त्यांची निगा राखणे व परिणामी महाविद्यालय परिसर व वनस्पतीशास्त्र उद्यान स्वच्छ व सुंदर दिसण्याच्या दृष्टीने प्रा.कु.तारामती सातपुते यांच्या सहकार्याने **प्रा.भाऊसाहेब भांगरे** वर्षभर कार्यरत होते.



## विद्यार्थिनी मंच

२७

महाविद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या लक्षात घेता मुलीचे मुलींसाठीचे 'विद्यार्थिनी मंच' नामक खुले व्यासपीठ असणे आवश्यक ठरते. मुलींचे प्रश्न समजून घेणे, त्यांची उत्तरे शोधणे, भविष्यात यशस्वी जीवन जगण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे या उद्देशाने व दिशेने मंच वर्षभर कार्यरत राहिला.

'सुसंवाद' कार्यक्रमासाठीच्या प्रमुख पाहुण्या मा.डॉ.सौ.राजलक्ष्मी कोळसकर यांनी 'विद्यार्थी जीवनात मिळालेले अनुभव व शिक्षण यांचा वास्तविक जीवनाशी मेळ घातला तर यशस्वी जीवन जगता येते व त्यासाठी मुलींनी शिक्षणाचा सदुपयोग करावा', असे आवाहन केले.

प्रा. सौ. सुमनताई मुठे (नाशिक) यांनी आपल्या 'मानव अधिकार व स्त्री ' या विषयावरील व्याख्यानातून मुलींना आपल्या अधिकारांचे माहिती करून दिली आणि ॲड्.प्रा. सौ. मंगला हांडे यांनी आपले अधिकार आपण कसे मिळवू शकतो, याबाबत मुलींना प्रबोधित केले.

**अध्यक्षा प्रा. डॉ. सौ. अकिला शेख** यांना प्रा. सौ. रजनी बारगजे व ॲड्. प्रा.सौ. मंगला हांडे यांनी वर्षभर सहकार्य केले.

## ब्युटी पार्लर विभाग

२८

य.च.म.मुक्त विद्यापीठांतर्गत 'ब्युटी पार्लर व्यवस्थापन' या शिक्षणक्रमासाठी ४ विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला. विद्यार्थिनींसाठी 'ब्युटी पार्लर व व्यक्तिमत्व विकास' या विषयावरील १० दिवसांची कार्यशाळा विभाग **प्रमुख सौ संगिता शहाणे** यांनी आयोजित केली.



*धूर्त आणि कावेबाज माणसाचे जीवन कदाचित सुरक्षित असेल पण सुखी असू शकणार नाही.* **– कार्लाईल.**

## सेवायोजन कक्ष व मार्गदर्शन योजना

**२९**



स्पर्धा परीक्षा, विविध अभ्यासक्रम, स्वयंरोजगार व व्यवसाय संधी याबाबत हे कक्ष मार्गदर्शन करते. चालू शै.वर्षीची कामगिरी पुढीलप्रमाणे -

१) विविध संस्थांद्वारे व नियतकालिकांतून येणारी नोकरी व व्यवसायविषयक माहिती काचफलकात लावून नंतर ती ग्रंथालयात संग्रहित करण्यात आली.

२) व्यवसाय मार्गदर्शनाचा एक भाग म्हणून पुढील मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली-

अ) मा.श्री. रतिलाल शहा, पोलिस उपअधीक्षक, सी.आय.डी. पुणे.

ब) श्री. सुनिल शिखरे, गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, अकोले.

क) श्री. दिगंबरराव देशमुख, सचिव, पुणे बोर्ड.

ड) माजी विद्यार्थी, श्री गोपाळ बुब

३) दि. २७/०९/२००५ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग आयोजनाबाबत मा.प्राचार्यांचे समवेत १५० विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लक्षात घेवून 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग' सुरू करण्याबाबत यू.जी.सी. कडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

४) २५ नोव्हेंबर २००५ रोजी ४ फेऱ्या (राऊंड्स) असलेली सामान्य ज्ञान तोंडी पारीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत ५० विद्यार्थी सहभागी झाले.

५) **योजनेचे प्रमुख प्रा. किरण जाधव** यांनी एम्.पी.एस्.सी. व यू.पी.एस्.सी. परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना वर्षभर मार्गदर्शन केले/ करीत आहेत.

मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन व प्रा. डॉ. विजय भगत, प्रा.कु. अर्चना नगरे यांचे सहकार्य लाभल्याचे योजना प्रमुखांनी नोंदविले आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र

**३०**



सदर विद्यापीठाच्या सप्टेंबर २००५,बी.ए., बी.कॉम. परीक्षांच्या पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी एकूण ७० विद्यार्थ्यांना तर प्रथम वर्ष कला या वर्गात १०३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना नियमित प्रत्येक रविवारी व्याख्यानांद्वारे मार्गदर्शन केले जाते. या कामी कनिष्ठ महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा.गोरक्ष शिरसाट, प्रा.डॉ. भास्करराव खांडगे, प्रा.श्रीशैल कुडगनुरे, प्रा.डी.एम् वाकळे, प्रा.एस्.टी चासकर, प्रा.के.एस्.गुंजाळ, प्रा.अभिमन्यू केदार, प्रा.साहेबराव गायकवाड, सौ.संगिता शहाणे, प्रा.अष्पाक पठाण, प्रा.राजेंद्र कर्पे या शिक्षकांचे तसेच श्री सुदेश काठाळे, श्री रविंद्र इपकल, श्री सखाराम पथवे, श्री वसंत जेडगुले, श्री संजय फटांगरे व श्रीमती पुष्पा भुजबळ व इतर सर्व प्रशासकीय कर्मचारी **संयोजक श्री लक्ष्मीकांत आगलावे** यांना सहकार्य करीत आहेत.

या अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी वार्षिक वादविवाद व निबंध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले.

## कार्यालय
३१



विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांची कामे कमीत कमी वेळेत होतील, अशी दक्षता ऑक्टोबर २००५ पासून महाविद्यालयात नव्याने निर्माण झालेल्या **'प्रबंधक'** (रजिस्ट्रार) पदावर नियुक्त झालेले **श्री लक्ष्मीकांत आगलावे** यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी घेत असतात.

**प्रशस्ती-** ''लोक चांगले काम करतात तेव्हा गोड शब्द न बोलता येण्याइतके कामात व्यग्र असू नका. संधी पकडून सहकाऱ्यांचे कौतूक मनमोकळेपणे करा,'' या सन्मार्गदर्शक तत्त्वानुसार जणु काय महाविद्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी संस्था व महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचे वेळी वेळेची अजिबात फिकीर न बाळगता अगदी झटून जी कामे केली त्याचा प्रशस्तिपर उल्लेख मा.प्राचार्य व मा.प्रबंधक यांनी या अहवालाच्या मसुद्यात केला आहे.

**गुणवंत शिक्षके तर सेवक पुरस्कार-** पुणे विद्यापीठाचा 'गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार' आमच्या महाविद्यालयातील श्री सादिक सय्यद यांना नुकताच मिळाला आहे; त्यांना सदर पुरस्कार प्रमाणपत्र, रू ५०००/- चा धनादेश व पुणे विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह १० फेब्रुवारी २००६ रोजी देण्यात आले आहे. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असलेल्या या गुणवंत सेवकाचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांच्या गुणवत्तेत उत्तरोत्तर वाढ होवो,ही शुभेच्छा !

**कार्यशाळा** - पुणे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ स्तरावरील प्रशासकीय सेवकांची व्दिदिवसीय कार्यशाळा (१८-१९ मार्च २००५)भंडारदरा या निसर्गरम्य व आल्हाददायक ठिकाणी आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेत ११० कर्मचारी सहभागी झाले होते. मा.डॉ.आर.बी.सिंग, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य प्रशासकीय कर्मचारी संघटना, मा.डॉ.नंदकुमार निकम,अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राचार्य फोरम, मा.श्री.मा.श.फिरंगे,परीक्षा नियंत्रक,पुणे विद्यापीठ,मा.श्री.मो.रा. परदेशी, सहाय्यक कुलसचिव,पुणे विद्यापीठ आदि मान्यवरांची या कार्यशाळेत मार्गदर्शक व्याख्याने झाली.अ.ता.ए.सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.विठ्ठलराव चासकर,सेक्रेटरी मा.ॲड् श्री.के.बी.हांडे,सहसेक्रेटरी मा.श्री. विलासराव आरोटे,खजिनदार मा.श्री. प्रविणचंद शहा, विस्तार-प्रमुख मा.श्री.हमीदभाई फारूकी, कार्यकारिणी सदस्य, मा.श्रीमती कांचनताई सुरपुरिया व मा.श्री.यशवंतराव आभाळे आदिंनी सदर कार्यशाळेला भेट दिली व विविध सत्रांचे अध्यक्षस्थान भूषविले. मा.प्राचार्य श्री.रमेशचंद्र खांडगे यांनी संपूर्ण दोन्ही दिवस या कार्यशाळेसाठी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. इतर अनेक महाविद्यालयातील प्रतिनिधींकडून या कार्यशाळेची उत्कृष्टता व यशश्विता उल्लेखिणारी पत्रे आम्हाला लाभली आहेत.



*कितीही अडचणी आल्या तरी तुमचे काम चालू द्या. न जाणो, शिखरावर पोचायला आणखी एकच पाऊल पुरेसे असेल.*

**प्रबंधकांची त्रिविध कामगिरी-** महाविद्यालयाचे प्रबंधक श्री लक्ष्मीकांत आगलावे यांनी उपरोक्त कार्यशाळेत 'आय.क्यू.ए.सी. व प्रशासकीय कर्मचारी' हा लेख सादर केला; श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा येथे 'आय.क्यू.ए.सी. मधे प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा सहभाग' व 'आरक्षण' या विषयांवर मार्गदर्शक व्याख्यानें दिली; (श्री आगलावे आपल्या महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी.चे (इंटरनल क्वालिटी ॲश्युरन्स सेल'चे सदस्य आहेत.) याशिवाय, महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन प्रशासकीय कर्मचारी संघटनेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून तसेच जिल्हा संघटनेच्या विविध समित्या व उपसमित्या मध्येही ते कार्यरत आहेत.

## आय.क्यू.ए.सी. (नॅक)

३२



आपल्या महाविद्यालयाची शैक्षणिक, संशोधकीय, खेळ-स्पर्धातील तसेच सामाजिक सेवा स्वरूपाच्या विविध कार्यातील गुणवत्ता वाढवून अधिक उच्च श्रेणी मिळविण्यासाठी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) व पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार आपल्या महाविद्यालयातील **'इंटर्नल क्वालिटी ॲश्युरन्स सेल'** मध्ये पुढील सदस्य कार्यरत आहेत -

| | |
|---|---|
| **अध्यक्ष-** | प्राचार्य रमेशचंद्र खांडगे |
| **ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी-** | श्री.लक्ष्मीकांत आगलावे (प्रबंधक), श्री.रामभाऊ गाडेकर |
| **शिक्षक-** | सर्वप्रा. नंदकुमार रासने, अब्दुलरहेमान शेख, संजय पगारे, संजय ताकटे, केशव नाईकवाडी, डॉ. अविनाश झांबरे, अशोक दातीर व साहेबराव गायकवाड. |
| **व्यवस्थापन-** | श्री.विठ्ठलराव चासकर, (अध्यक्ष, अ.ता. ए. सोसायटी, अकोले) ॲड्.श्री.किसनराव हांडे (सेक्रेटरी, अ.ता.ए.सोसायटी, अकोले) |
| **स्थानिक समाज प्रतिनिधी-** | श्री.सुरेशराव कोते व श्री.अनिल आयकवाड |
| **समन्वयक-** | प्रा.डॉ.विजय बाणकर |



*जास्त काम करण्यात जी मजा आहे ती कमी काम करण्यात नाही.*

# वार्षिक अहवाल

## ( कनिष्ठ महाविद्यालय )

❊

**'आपल्याला निसर्ग आवडतो', हे काही त्यावर प्रेम करण्याचे एकमेव कारण नव्हे. केवळ त्याचे 'असणे' आणि मग तो जसा असेल, तसा सुंदर, उग्र, भीषण, कसाही ... हे ही त्यावर प्रेम बसण्याचे एक कारण असू शकते !**

❊

| शब्दांकन व मांडणी | संकल्पना |
|---|---|
| **प्रा.डॉ. सुनील शिंदे** | प्राचार्य **रमेशचंद्र खांडगे** |
| समन्वयक : | उपप्राचार्य : **गोरक्ष शिरसाट** |
| **श्री. लक्ष्मीकांत आगलावे**, प्रबंधक | पर्यवेक्षक : **प्रा.डॉ. भास्करराव खांडगे** |

## ※ विद्यार्थी मंडळ ※

**अध्यक्ष : प्रा. बाळासाहेब शेटे**

शैक्षणिक वर्षात गुणवत्तेच्या निकषावर वर्गप्रतिनिधींची निवड करण्यात आली. जनरल सेक्रेटरी पदासाठी कु. आरती विलास आरोटे हिची निवड झाली. कनिष्ठ महाविद्यालय, विद्यार्थींनी प्रतिनिधी म्हणून कु. माधुरी देशमुख हिची निवड झाली.

५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.शिक्षक दिनामध्ये ५९ विद्यार्थी शिक्षकांनी भाग घेतला त्यात उत्कृष्ट विद्यार्थी शिक्षक म्हणून सत्यजित खांडगे व शिक्षिका म्हणून कु.धर्माधिकारी यांची निवड झाली. भारूडकार भानुदास बैरागी यांचे हस्ते विद्यार्थी मंडळाचे उद्‌घाटन झाले. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष, मा.ॲड्. वसंतराव मनकर आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. पारंपारिक वेशभूषा दिवस साजरा करून,बुध्दिमापन चाचणी परीक्षा घेतली. त्यात सत्यजित खांडगे व माधुरी देशमुख यांना मास्टर व मिस ज्युनिअर म्हणून सन्मानित केले.

संगमनेर विभागीय पोलिस अधिकारी संजय पाटील, यांचे व्याख्यान, कवी इंद्रजित भालेराव यांचे काव्य वाचन-गायन, एच.एस्.सी. बोर्ड परीक्षा शुभेच्छा व मार्गदर्शन पर व्याख्याने असे विविध उपक्रम घेण्यात आले.

## ※ कला मंडळ ※

**अध्यक्ष : प्रा. ओंकार राठी**

वार्षिक स्नेहसम्मेलनानिमित्त मराठी गीत गायन, हिंदी गीत गायन, अभिनय, मेहंदी, रांगोळी या स्पर्धांसह विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या सर्व स्पर्धांत **कु. श्वेताली वाकचौरे, स्वदेश दीक्षित** हे प्रथम क्रमांक विजेते ठरले. गणेश उत्सव, अकोले फेस्टिवलमध्ये कु. श्वेताली वाकचौरे हिने प्रतिनिधीत्व केले. वर्षभरातील उपक्रमांत **प्रा. चांगदेव डोंगरे, प्रा. संभाजी गायकवाड, बाळासाहेब गोर्डे, प्रा. बिराजदार** यांनी सहकार्य केले.

## ※ शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग ※

**संचालक : प्रा. नंदकुमार काळण**

क्रीडा विभागातर्फे विविध स्पर्धांसाठी संघ पाठविण्यात आले. कबड्डी, खो-खो, हॅण्डबॉल, थ्रो बॉल, ॲथेलॅटिक्स, क्रॉसकंट्री, वेटलिफ्टिंग, तायक्वोंदो, बुद्धीबळ, मल्लखांब, रोप मल्ल खांब, कुस्ती या क्रीडा प्रकारांत संघ पाठविले गेले. आपल्या महाविद्यालयात पार पडलेल्या तालुका स्तर कबड्डी स्पर्धेत मुलांचा संघ विजयी आणि मुलींचा संघ उपविजयी ठरला. विजयी मुलांच्या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा त्रिमूर्ती प्रतिष्ठान, नेवासा येथे संपन्न झाल्या. त्या ठिकाणी संघ सहभागी झाला.

अगस्ति विद्यालय, अकोले येथे झालेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत १९ वर्षांच्या आतील गटात मुलांचा संघ विजयी आणि मुलींचा संघ उपविजयी ठरला. जिल्हास्तरीय स्पर्धा, तसेच सोनई, ता. नेवासा येथील मुळा पब्लिक स्कूल येथे पार पडलेल्या स्पर्धेत खो-खो चा संघ सहभागी झाला.



*अगदी नेपोलियनसुद्धा १/३ लढाया हरला होता.*

# अगस्त्य

आपल्या महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या जिल्हास्तरीय, शालेय व ग्रामीण हॅण्डबॉल स्पर्धे अंतर्गत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला. मुलींचा संघ विजयी ठरला. जिल्हास्तरीय मुलांच्या हॅण्डबॉल स्पर्धेतून दयानंद बोऱ्हाडे याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सोलापूर येथे पार पडलेल्या हॅण्डबॉल स्पर्धेत राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी कु. आरती विलास आरोटे व अस्मिता यशवंत आरोटे यांची निवड झाली. राष्ट्रीय स्पर्धांतर्गत महाराष्ट्राच्या संघात निवड चाचणीत संघ सामाविष्ट झाला.

जिल्हा हॅण्डबॉल असोसिएशन तर्फे ७ मुले व १ मुलगा अशी निवड स्पर्धेकरिता महाविद्यालयातून झाली. राज्यस्तरीय सिनिअर महिला व पुरूष हॅण्डबॉल चॅम्पीयनशीप स्पर्धा परभणीत पार पडल्या.तेथे खेळाडू सहभागी झाले. राज्य हॅण्डबॉल स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेकरिता कु. आरती विलास आरोटे हिची महाराष्ट्र संघात निवड झाली. रायपूर, छत्तीसगड येथील ३४ व्या वरिष्ठ महिला नॅशनल हॅण्डबॉल चॅम्पीयनशिप स्पर्धेत खेळाडू सहभागी झाले.

भिंगार येथील जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत संघ सहभागी झाला. आपल्या महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेतून जिल्हास्तरावरील स्पर्धांकरिता खेळाडूंची निवड झाली. जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेतून वसंत सोमनाथ शेंडे व मीना रामभाऊ आवारी यांची पुणे विभागीय स्पर्धेकरिता निवड झाली. श्री छत्रपती क्रीडापीठ, बालेवाडी, पुणे व जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएयन तर्फे अहमदनगर येथे पार पडलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी खेळाडू पाठविण्यात आले. औरंगाबाद येथील स्पर्धेसाठीही संघ पाठविण्यात आला.

► श्रीरामपूर येथे झालेल्या जिल्हा स्तरीय तायक्वोंदो स्पर्धेत अमर भाऊसाहेब इरनक याने द्वितीय क्रमांक मिळविला.

► श्रीरामपूर येथे झालेल्या जिल्हा स्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला. **कु. स न े ह ल नानासाहेब खर्डे प्रथम** आली. सीमा देशमुख व सुजाता बिबवे अनुक्रमे दुसरी व चौथी आली. पुणे विभागीय स्पर्धेसाठी तिघींची जिल्ह्यातून निवड झाली. महेंद्र गोंदके व गौरव कडलग हे द्वितीय व तृतीय आले. या दोघांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

► मॉडर्न हायस्कूल, अकोले येथे झालेल्या तालुका स्तर स्पर्धेसाठी निवड झाली.

► **वेटलिफ्टिंग :-**

श्रीरामपूर येथे आर.बी.एम्.बी. महाविद्यालयात झालेल्या स्पर्धेत अमित शिंदे, धनंजय शेटे, स्वप्नील एखंडे, योगेश्वर नाईकवाडी यांनी यश संपांदन केले.

► **थ्रो-बॉल :-**

पाथर्डी येथे झालेल्या जिल्हा-स्तरीय स्पर्धेत मुलींचा संघ विजयी झाला. याच संघाची नगर जिल्ह्यातर्फे पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

► **रोप मल्लखांब :-**

नगर येथील पेमराज सारडा कॉलेजमध्ये जिल्हा स्तर स्पर्धा झाल्या. कु. रूपाली संपत गायकवाड हिचा दुसरा क्रमांक आला. तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जेऊर (सोलापूर) येथील पुणे विभागीय स्पर्धेत खेळाडू सहभागी झाली.

► **मल्लखांब :-**

पेमराज सारडा कॉलेज, नगर येथील झालेल्या जिल्हा स्तर स्पर्धेत आपला खेळाडू प्रथम आला. पुणे विभागीय स्पर्धेतून **पारधी कुंडलिक चिंधु** याची राज्यस्तरावर निवड झाली. चिंचवड, पुणे येथे झालेल्या राज्य स्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर



*जोपर्यंत एखादी गोष्ट करण्यात माणसाला आनंद मिळत नाही, तोपर्यंत त्या गोष्टीत त्याला यशही मिळत नाही.*

जिल्ह्यातर्फे पारधी कुंडलिक याची निवड झाली.

अंधेरी, मुंबई येथे राज्य स्तर चॅम्पियन स्पर्धेत खेळाडू सहभागी झाले. शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने कबड्डी, हॅण्डबॉल, मैदानी स्पर्धा, तालुका क्रीडा नैपुण्य चाचण्या या स्वरूपात स्पर्धा घेतल्या बाहेरगांवच्या संघांची निवास व्यवस्था विनोदशेठ रासने यांनी 'कै. काकासाहेब रासने मंगल कार्यालयात' केली आम्ही कृतज्ञ आहोत.

स्नेहसंमेलनानिमित्त वार्षिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. वर्षभराच्या कार्यामध्ये मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्यासह सर्व प्राध्यापक, समिती सदस्य, सेवाभावी संस्था, शासकीय, निमशासकीय अधिकारी यांनी सहकार्य दिले.

## * वादविवाद मंडळ *

**अध्यक्ष : प्रा. प्रकाश जगताप**

शैक्षणिक वर्षात, कै.डॉ. देवेंद्र ओहरा ज्युनिअर कॉलेज संगमनेर, दामोदर मालपाणी मेमोरिअल ट्रस्ट, नगर येथील कॉम्रेड भागवत स्मृती करंडक वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आणि स्नेहसंमेलनाच्या औचित्याने घेतलेल्या स्पर्धेत स्वदेश दीक्षित, उमेश चौधरी. कु. वर्षा ओंकार राठी या स्पर्धकांनी नैपुण्य प्राप्त केले.

## * वाङ्मय मंडळ *

**अध्यक्ष : प्रा.डॉ. अनिरुद्ध वांगडे**

कवी इंद्रजित भालेराव यांच्या प्रभावी काव्यवाचन कार्यक्रमाने झालेले उद्घाटन वैशिष्ट्य ठरले.

'वन्यजीव सप्ताह', महाराष्ट्र राज्य, वनविभाग, नागपूर यांचे तर्फे आयोजित निबंध, चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये कु. शीतल दशरथ वाकचौरे व शीतल बबन गायकवाड या स्पर्धकांनी प्रथम क्रमांक मिळविला.

## * आरोग्य विज्ञान विभाग *

**प्रमुख : प्रा. संजय लांडगे**

प्रा. एस. ए. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासणीस सहकार्य केले. डॉ. सोनवणे यांनी रक्तदान शिबीर घेऊन सहकार्य दिले. डॉ. एस्.जी.बंगाळ यांनी बहुसंख्य विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. प्रा. गंगाधर लांडगे यांनी योगासनांच्या उपयुक्ततेसंदर्भात मार्गदर्शन केले.

## * सामाजिक समता मंडळ *

**अध्यक्ष : प्रा. बाळासाहेब पवार**

वार्षिक निबंध व वादविवाद स्पर्धांमध्ये **मोरे जयमाला मधुकर व कडलग गौरव लक्ष्मण** या स्पर्धकांना प्रथम क्रमांक मिळाला.



*रागामध्ये आलेला उतार ही बुद्धिचा कस वाढल्याची निशाणी आहे.*

## * विज्ञान मंडळ *

**अध्यक्ष : प्रा. चांगदेव डोंगरे**

'विज्ञान आणि पर्यावरण' विषयावरील भेटकार्ड स्पर्धा, औरंगाबाद येथील चाटे कोचिंग क्लासचे प्रा. एस्. जी. कुलकर्णी यांचे एम्. एच्. सी. ई. टी. परीक्षेसंदर्भातील व्याख्यान लक्षवेधी ठरले.

'विज्ञान प्रश्न मंजुषा' आयोजित केली गेली. अहमदनगरच्या पेमराज सारडा कॉलेजमधील प्रा. चिंधे यांनी प्रवेशपूर्व चाचण्या, स्पर्धा परीक्षा या संदर्भात व्याख्यान दिले.

'मनोरंजनातून गणित व विज्ञान' या विषयावर श्रीरामपूरचे उत्तमचंद चोरडिया यांचे व्याख्यान झाले.

'विज्ञान बुद्धिमत्ता चाचणी' चे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेला उत्तम प्रतिसाद लाभला. विविध स्पर्धांतर्गत, अमित साहेबराव वैद्य, मोरे विकास बाळासाहेब यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

## * परिसर विकास *

**अध्यक्ष : प्रा. बाबासाहेब शेवाळे**

वृक्षारोपन आणि वेळोवेळी महाविद्यालय परिसराची केलेली स्वच्छता हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले.

## * परीक्षा विभाग *

**अध्यक्ष : प्रा. गंगाधर लांडगे**

घटकचाचण्या व सहामाही, मध्यसत्र आणि वार्षिक परीक्षांचे यशस्वी नियोजन करण्यात आले. प्रा. देविदास चौधरी, प्रा. संजय लांडगे, प्रा. तानाजी जाधव व प्रा. सतीश काळे यांनी अध्यक्षांना सहकार्य केले.

## * राष्ट्रीय सेवा योजना *

**कार्यकारी अधिकारी : प्रा. विवेक वाकचौरे**

शैक्षणिक वर्षात १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला. मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे हस्ते वर्षभरातील कार्यक्रमांच्या शुभारंभाचे उद्घाटन झाले.

१) गणेशमूर्ती दान व निर्माल्यदान उपक्रम लक्षवेधी ठरला. या उपक्रमाची राज्यपातळीवर राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा दखल घेतली गेली.

२) वाघापूर, ता. अकोले येथे विशेष हिवाळी शिबीर पार पडले. शिबीराचे यजमानपद मा. सुरेशराव कोते, कार्यकारी संचालक, लिज्जत पापड यांनी स्वीकारले. स्वयंसेवकांनी ७०० मीटर्स लांबीचा मन्याळे घाट व सलग समपातळी चर तयार करण्याकामी श्रमदान केले.

३) नवलेवाडी, ता. अकोले येथे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना भरीव सहकार्य केले.

सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक मेमाणे मयुर विश्वास आणि सर्वोत्कृष्ठ स्वयंसेविका कु. ढगे प्रमिला अशोक यांची निवड झाली. यामध्ये प्रा. बाळासाहेब शेटे, प्रा. ओंकार राठी, प्रा. अशोक कडलग, प्रा. तानाजी जाधव व प्रा. बांबळ यांनी सहकार्य केले.



*तुमच्याकडे जे सर्वात चांगले आहे ते जगाला द्या आणि पाहा, तेच तुमच्याकडे परत येतील.*



# प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कार्यकर्तृत्व



तुम्ही करता तो व्यवसाय जगातला मोठ्यात मोठा व्यवसाय आहे, असा तुमचा विश्वास असल्याशिवाय तुम्ही तुमच्या व्यवसायात कधीच यशस्वी हाऊ शकणार नाही. तुम्हाला तुमच्या व्यवसायात जीव ओतला पाहिजे आणि तुमचा जीव म्हणजे तुमचा व्यवसाय झाला पाहिजे.



*टेनिसचेच पहा ना, जो सर्व्हिस चांगली करतो तो क्वचितच हरतो.*

# प्राध्यापकांचे कार्यकर्तृत्व

## अ) वरिष्ठ महाविद्यालय

### १) प्रा.डॉ.अविनाश झांबरे-

१. भौतिकशास्त्र विषयातील शोध-प्रबंधाबद्दल 'महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा' कडून विद्यावाचस्पती (पीएच्.डी) या पदवीने सन्मानित.

२. १४ राष्ट्रीय व २ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेऊन प्रबंध-विषयाशी निगडित असे १५ शोध-निबंध सादर व त्यापैकी ९ शोध - निबंध प्रकाशित.

### २) प्रा.डॉ.शिवाजी खेमनर-

'प्रॉब्लेम अॅन्ड प्रॉस्पेक्ट्स् ऑफ ट्रायबल पॉप्युलेशन इन दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट'
या विषयावरील शोध प्रबंधाबद्दल पुणे विद्यापीठाकडून विद्यावाचस्पति (पीएच्.डी) या पदवीने सन्मानित.

### ३) प्रा.डॉ.विजय भगत -

१. 'अॅग्रोबेस्ड मॉडेल फॉर सस्टेनेअल डेव्हलपमेंट इन दि पुरंधर तहसील ऑफ दि पुणे डिस्ट्रिक्ट' या शोध प्रबंधाबद्दल पुणे विद्यापीठाकडून विद्यावाचस्पति (पीएच्.डी) या पदवीने सन्मानित.

२. 'महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, पुणे' या अर्धवार्षिक संशोधन पत्रिकेत (जून-डिसेंबर २००४) रिसर्च पेपर प्रकाशित.

३. कोलकत्ता येथील 'अ जर्नल ऑफ इन्स्टिट्युट ऑफ लॅन्डस्केप, इकॉलॉजी अॅण्ड एकिस्टिक्स' च्या व्हॉल्यूम २८.क्र.१ मध्ये (२००५-२००६) रिसर्च पेपर प्रकाशनार्थ स्वीकृत.

४. मार्केट रिस्क अॅनॅलिसीस फॉर अॅग्रो-प्रॉडक्टस्- अ केस स्टडी ऑफ पुणे मार्केट (महाराष्ट्र स्टेट) या विषयाचा शोधनिबंध *उत्तर प्रदेश जिऑग्राफीकल जर्नल,* दि ब्रह्मावर्त जिऑग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया, कानपूर, व्हॉल्यूम-१० मध्ये प्रकाशित. पृष्ठे १५ ते १९, (२००५)

५. न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनरग व पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'भौगोलिक माहिती प्रणाली' व 'सुदूर संवेदन' या विषयांवरील प्राध्यापकांसाठीच्या कार्यशाळेत व्याख्यान.

६. राजूर, ता. अकोले, येथील महाविद्यालयात 'सुदूर संवेदन' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान.

७. पंचायत समिती अकोले आयोजित प्राथमिक शिक्षकांच्या शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कन्या विद्या मंदीर येथे व्याख्याने.



*बरीच भाषणे एका दिवसात विसरली जातात. तुम्ही तुमचे भाषण असे तयार करा की, बरीच वर्षे ते मनात रेंगाळत राहील.*

(पुणे), घोडेगाव व राजगुरूनगर येथील महाविद्यालयात मार्गदर्शक व्याख्याने.

३. संगमनेर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत एम्.ए. अर्थशास्त्र भाग-२ कार्यशाळेत सहभाग.

४. ३ - ४ डिसेंबर २००४ रोजी ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे येथे झालेल्या इयत्ता ११ वी व १२ वी या वर्गांच्या पुनर्रचित अभ्यासक्रमात साधन व्यक्ती (रिसोर्स पर्सन) म्हणून काम.

५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या अभ्यासक्रम विकसन विभागाने दिनांक ९-१० ऑगस्ट २००५ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - राज्य स्तरीय कार्यशाळेत सहभाग.

६. पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत जागतिकीकरण व पाण्याचे व्यवस्थापन या विषयावर आण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथे दिनांक २९ /०९/२००५ रोजी व्याख्यान

## ८) प्रा.डॉ. सौ. अकीला शेख -

१. भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली तर्फे सावित्रिबाई फुले नॅशनल फेलोशिप अवार्ड म्हणून प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह .

२. बी.एस्.टी. कॉलेज, संगमनेर येथे गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत सेमिनारमधे निमंत्रित व्याख्याती म्हणून मार्गदर्शन.

## ९) प्रा.मेजर बी.आर.शिंदे-

महाराष्ट्र, तमिळनाडू, केरळ, काश्मीर आदि राज्यातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या सहभागी १२६ छात्रांचे व ४ अधिकाऱ्यांचे नेतृत्व व आपल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील उपक्रमांमधे सक्रिय सहभागी होण्यासाठीचे प्रेरक व प्रोत्साहक कार्य.

## १०) प्रा.डॉ. विजय बाणकर -

नॅक, बंगलोर आणि य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २००६ रोजी न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर येथे आयोजित केलेल्या 'टेक्नॉलॉजी एनेबल्ड इंटरॲक्टिव्ह वर्कशॉप फॉर ॲक्रिडिटेड इन्स्टिट्यूशन्स इन महाराष्ट्र मध्ये सक्रिय सहभाग.'

# प्राध्यापकांचे कार्यकर्तृत्व

## ब – कनिष्ठ महाविद्यालय

### १) प्रा.डॉ. भास्कर खांडगे :

१) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक परिषद, पुणे येथे कार्यशाळेसाठी निवड.

२) प्रवरानगर येथील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून नियुक्ती .

३) व्याख्याने-अकोले पोलिस स्टेशन व होमगार्ड करिता 'ताण तणाव मुक्तीवर' तसेच अकोले पंचायत समिती कार्यशाळेत, माळवाडी, तालुका सिन्नर येथे पुणे राज्य साधन केंद्र कार्यशाळा, कुडाळ जि. सिंधुदुर्ग, सावंतवाडी, (जि. सिंधुदुर्ग), मानोरी न्यु इंग्लिश स्कूल, सिन्नर, बदगी बेलापूर, अहमदनगर येथील विवेकानंद इंग्लिश स्कूल, सोनई (ता.नेवासा) महाविद्यालय, अकोले येथील अगस्ति विद्यालय, राहुरी कृषी विज्ञान प्रदर्शन, त्रिमूर्ती प्रतिष्ठान नेवासा फाटा, मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद येथे.

४) देवगिरी कॉलेज, औरंगाबाद येथे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य

५) बेस्ट ज्युनिअर कॉलेज टिचर्स अॅवॉर्ड, औरंगाबाद तर्फे जाहीर.

६) अनंत फंदी प्रतिष्ठान, वादविवाद स्पर्धा, संगमनेर येथे परीक्षक.

७) राज्य साधन केंद्र, पुणे तर्फे अहमदनगर येथे तपासणी कार्यात साधन व्यक्ती.

### २) प्रा.गंगाधर लांडगे :

१) दया पवार आत्मकथन पुरस्कार, (मालेगांव, जि. वाशिम)

२) राष्ट्रीय एकात्मता सन्मान, मुंबई, समाज प्रबोधन.

३) गोदारत्न पुरस्कार नाशिक.

४) अंकुर साहित्य संमेलन, वाशिम येथे सहभाग.

५) पंचायत समिती, अकोले, येथे व्याख्यान.

६) संगमनेर येथे योग व प्राणायाम प्रशिक्षणात मार्गदर्शन.

६) एच्. एस्.सी. पुणे बोर्ड, नवीन अभ्यासक्रमासाठी मानसशास्त्राचे समीक्षक म्हणून निवड.

### ३) प्रा. सखाराम चासकर :

१) नॅशनल एज्युकेशन अॅण्ड ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंन्ट आर्गनायझेशन, दिल्ली पुरस्कृत 'राष्ट्रीय शिक्षा सन्मान' पुरस्कार.

२) अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीसाठी चेअरमनपदी निवड.



*महत्त्वाची कामे लगेच हातावेगळी करा; नाहीतर ती तातडीची होऊन बसतील.*

**४) प्रा. डॉ. सुनील शिंदे :**

१) आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्था, पुणे पुरस्कृत 'संत एकनाथ गौरव स्मृती पुरस्कार' एम आय टी कॉलेज पुणे येथे जलसंपदा मंत्री ना. अजित पवार यांचे हस्ते प्राप्त.

२) आष्टी तालुका मित्र मंडळ, नगर व शिवशंभो ट्रस्ट अंभोरा पुरस्कृत 'पोपटराव पवार समाजमित्र' पुरस्कार जिल्हाधिकारी दांगट यांचे हस्ते प्राप्त.

३) पद्मगंधा प्रकाशन, पुणे संपादित 'मोरजाई' या ग्रंथात 'साक्षेपी गुरूवर्य' शीर्षकाचा संशोधित लेख प्रकाशित.

४) 'पेमराज सारडा कॉलेज' अहमदनगर येथील चर्चासत्रात 'पदव्यूत्तर मराठी अभ्यासक्रम-अध्ययन, अध्यापन स्वरूप व दिशा' विषयावर शोधनिबंध सादर व सहभाग.

५) 'भाऊसाहेब संतुजी थोरात कॉलेज', संगमनेर आयोजित चर्चासत्रात, 'मर्मभेदी शब्दकळा लाभलेले क्रांतीकारी कवी-विं.दा. करंदीकर' या विषयावर गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत शोधनिबंध सादर.

६) 'अगस्त्य वृत्तसेवा आणि विचार व्यासपीठ' या सांस्कृतिक उपक्रमाचे मानस सल्लागार व निमंत्रक.

७) 'लोकमत' 'लोकसत्ता' सह विविध नियतकालिकांतून प्रासंगिक लेख प्रकाशित.

८) राष्ट्रसेवा दल, छात्रभारती, अमृतभाई मेहता प्रतिष्ठान आयोजित साने गुरूजी जयंती कार्यक्रमात व्याख्यान.

९) छत्रपती संभाजी राजे पुण्यतिथी औचित्याने जिल्हा परिषद मराठी शाळा, कुभेफळ येथे व्याख्यान.

१०) अहमदनगर न्यू आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेजमध्ये पथक तपासणीतील विषय तज्ञांसाठी प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन.

११) स्नेहसंमेलनानिमित्त अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांचे आजोबा गो. नी. दांडेकरांच्या अकोले वास्तव्यातील पत्रव्यवहार, वृत्तांत, लेख यांवर माहितीपर संकलन प्रदर्शन.

१२) तनुश्री प्रकाशना तर्फे मे २००६ मध्ये प्रकाशित झालेल्या विश्वविक्रमी 'प्रेमा तुझा रंग कसा' या काव्यसंग्रहासाठी 'गोंदण' या शीर्षकाच्या कवितेची निवड. प्रस्तुत काव्यसंग्रह 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मधील नोंदीच्या वाटेवर नामांकन झालेला आहे.

**५) प्रा. ओंकार राठी :**

* महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे आयोजित राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत पारितोषिक

**६) प्रा. देविदास चौधरी :**

* 'अगस्त्य वृत्तसेवा आणि विचार व्यासपीठ ' या सांस्कृतिक उपक्रमाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती.

**७) प्रा. नंदलाल काळण :**

१) अ.नगर जिल्हा रस्सीखेच असोसिएशनचे उपाध्यक्ष म्हणून निवड.

२) अ.नगर जिल्हा हॅण्डबॉल असोसिएशनचे सहसचिव म्हणून निवड.



*स्वत:चे विचार मांडू शकणाऱ्या माणसाकडे नेतृत्व चालून येते.*

३) महाराष्ट्र राज्य हॅण्डबॉल असोसिएशन तर्फे परभणीतील सिनिअर हॅण्डबॉल स्पर्धेतील जिल्हा महिला संघाचे मार्गदर्शक म्हणून निवड.

४) जिल्हा स्तर बुध्दिबळ, हँडबॉल स्पर्धेसाठी पंच म्हणून निवड.

**८) प्रा. गणपत नवले :**

१) स्मार्ट-पी.टी. इंग्रजी पुनर्रचित प्रशिक्षण कार्यक्रमात प्रशिक्षणासाठी निवड

२) देवगड (नेवासा) येथील प्रशिक्षणात तज्ज्ञ मार्गदर्शक.

३) इंग्रजी प्रशिक्षण कार्यक्रमात, संगमनेर येथे निरीक्षक.

४) विद्यालयांतून इंग्लिश अध्यापनाबाबत मार्गदर्शन, व्याख्याने.

# प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कार्यकर्तृत्व

## क – कार्यालय

**१) श्री. सादिक सय्यद :**

'गुणवंत' शिक्षकेतर सेवक या पुणे विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने सन्मानित. पुरस्कार प्रमाणपत्र, रुपये ५,०००/- चा धनादेश व पुणे विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह दिनांक १० फेब्रुवारी २००६ रोजी प्राप्त.

**२) श्री. लक्ष्मीकांत आगलावे :**

महाविद्यालयातील पूर्वीच्या लघु लेखक पदावरून प्रबंधक पदावर नियुक्ती (पदोन्नती).



*इतरांकडून ज्या वर्तणुकीची अपेक्षा तुम्ही बाळगता तसे तुम्ही स्वतः वागायला हवे.*

## अ) वरिष्ठ महाविद्यालय **प्राध्यापक वृंद**

| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शिक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | **प्रा. रमेशचंद्र खांडगे** | प्राचार्य व विभाग प्रमुख | इंग्रजी | एम्. ए. बी. एड्. |
| २ | प्रा. रासने एन. एम. | विभाग प्रमुख | वाणिज्य | एम्. कॉम. |
| ३ | प्रा. पाटील ए. डी. | विभाग प्रमुख | भूगोल | एम्. ए. |
| ४ | प्रा. शेख ए. बी. | ग्रंथपाल | ---- | एम्. ए. एम्. लिब. |
| ५ | प्रा. देशमुख आर. जी. | व्याख्याता | वाणिज्य | एम्. कॉम. |
| ६ | प्रा. डॉ. बाणकर व्ही. के. | विभाग प्रमुख | तत्त्वज्ञान | एम्. ए. पीएच्. डी. |
| ७ | प्रा. दिघे एस्. बी. | शारीरिक शिक्षण संचालक | ---- | बी. ए. एम्. पी. ई. |
| ८ | प्रा. डॉ. बारगजे एम्. ए. | विभाग प्रमुख | अर्थशास्त्र | एम्. ए. पीएच्. डी. |
| ९ | प्रा. सौ. बारगजे आर. एम्. | विभाग प्रमुख | मराठी | एम्. ए. |
| १० | प्रा. महाले बी. एम्. | व्याख्याता | मराठी | एम्. ए. |
| ११ | प्रा. शिंदे बी. आर. | व्याख्याता | अर्थशास्त्र | एम्. ए. बी. एड्. |
| १२ | प्रा. डॉ. शेख ए. एम्. | विभाग प्रमुख | हिंदी | एम्.ए.बी.एड्. एम्.फिल.पीएच्.डी. |
| १३ | प्रा. केदार ए. ए. | विभाग प्रमुख | राज्यशास्त्र | एम्.ए. बी. एड्. एम्. फिल. |
| १४ | प्रा. पगारे एस्. बी. | व्याख्याता | इंग्रजी | एम्. ए. पी. जी. डी. टी. ई. |
| १५ | प्रा. ताकटे एस्. बी. | विभाग प्रमुख | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. |
| १६ | प्रा. मेहेत्रे बी. डी. | विभाग प्रमुख | गणित | एम्. एस्सी. |
| १७ | प्रा. नाईकवाडी के. बी. | विभाग प्रमुख | प्राणिशास्त्र | एम्. एस्सी. डी. एच्. ई. |
| १८ | प्रा. देशमुख बी. एस्. | विभाग प्रमुख | वनस्पतीशास्त्र | एम्. एस्सी. एम्. फिल. |
| १९ | प्रा. भाटे ए. टी. | विभाग प्रमुख | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी. डी. एच्. ई.एम्.एड. |
| २० | प्रा. मालुंजकर एस्. के. | व्याख्याता | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. |
| २१ | प्रा. भांगरे बी. के. | व्याख्याता | वनस्पतीशास्त्र | एम्. एस्सी. |
| २२ | प्रा. डॉ. झांबरे ए. पी. | व्याख्याता | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी. |
| २३ | प्रा. बाणाईत एम्. डी. | व्याख्याता | रसायणशास्त्र | एम्. एस्सी. |
| २४ | प्रा. दातीर ए. एम्. | व्याख्याता | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी |
| २५ | प्रा. गायकवाड एस्. एस्. | व्याख्याता | हिंदी | एम्. ए. |
| २६ | प्रा. सोनवणे एस्. एम्. | व्याख्याता | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. (सेट) |
| २७ | प्रा. डॉ. खेमनर एस्. बी. | व्याख्याता | भूगोल | एम्. ए. बी. एड्. पीएच्. डी. |
| २८ | प्रा. सौ. हांडे एम्. के. | व्याख्याता | वाणिज्य | बी. ए. एल्. एल्. बी. |
| २९ | प्रा. देशमुख बी. बी. | व्याख्याता | इंग्रजी | एम्. ए. |
| ३० | प्रा. डॉ. शेडगे व्ही. एस्. | व्याख्याता | तत्त्वज्ञान | एम्. ए. एम्. फिल.पीएच्.डी. |
| ३१ | प्रा. सय्यद वाय. जी. | व्याख्याता | राज्यशात्र | एम्. ए. |
| ३२ | प्रा. साळवे एस्. व्ही. | व्याख्याता | इंग्रजी | एम्. ए. |
| ३३ | प्रा. जाधव के. एस. | विभाग प्रमुख | इतिहास | एम्. ए. (सेट ॲण्ड नेट) |
| ३४ | प्रा. डॉ. भगत व्ही. एस्. | व्याख्याता | भूगोल | एम्. ए. पीएच्. डी. |
| ३५ | प्रा. गुंजाळ के. एस्. | विभागप्रमुख | संगणकशास्त्र | एम्. सी. एम्. |
| ३६ | प्रा. आहेर एल्. एस्. | व्याख्याता | रसायनशास्त्र | एम्.एस्सी.,(सेट) |
| ३७ | प्रा. कु.नगरे ए. एस्. | व्याख्याता | पदार्थविज्ञान | एम्.एस्सी. |



*प्रामाणिक राहा, माहीत नसेल तर तसे सांगा. माहीत असेल पण सांगायचे नसेल तर तसे सांगा.*

## ब) कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वृंद


| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शिक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जी. बी. शिरसाठ | उपप्राचार्य | इतिहास | एम्. ए. बी. एड्. |
| २ | श्री. डॉ. बी. डी. खांडगे | पर्यवेक्षक | मराठी | एम्. एड्. पीएच्. डी. |
| ३ | श्री. डॉ. ए. जी. वांगडे | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्. ए. बी. एड्. पीएच्. डी. |
| ४ | श्री. एस्. एल्. कुडगनुरे | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम्. ए. बी. एड्. |
| ५ | श्री. ए. एम्. काळे | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम्. ए. बी. एड्. |
| ६ | श्री. ए. के. देशमुख | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम्. कॉम. डी. एच्. ई. |
| ७ | श्री. जी. एन्. लांडगे | सहाय्यक शिक्षक | मानसशास्त्र | एम्. ए. डी. एच्. ई. एम्. फिल |
| ८ | श्री. जी. के. हासे | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम्. ए. डी. एच्. ई. |
| ९ | श्री. डी. एम्. वाकळे | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम्. ए. डी. एच्. ई. |
| १० | श्री. एस्. टी. चासकर | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम्. ए. बी. एड्. |
| ११ | श्री. पी. आर. जगताप | सहाय्यक शिक्षक | राज्यशास्त्र | एम्. ए. बी. एड्. |
| १२ | श्री. ए. बी. हुलवळे | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम्. ए. डी. एच्. ई. |
| १३ | श्री. डॉ. एस्. बी. शिंदे | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम्. ए. बी. एड्. |
| १४ | श्री. ए. एन्. फापाळे | सहाय्यक शिक्षक | राज्यशास्त्र | एम्. ए. डी. एच्. ई. |
| १५ | श्री. एन्. पी. काळन | शारीरिक शिक्षण संचालक | ----- | एम्. कॉम्. एम्. पी. एड्. |
| १६ | श्री. ओ. एस्. राठी | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम्. ए. बी. एड्. |
| १७ | श्री. बी. पी. शेटे | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्. ए. बी. एड्. |
| १८ | श्री. बी. एच्. पळसकर | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी. बी. एड्. |
| १९ | श्री. बी. एस्. शेवाळे | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्. एस्सी बी. एड्. |
| २० | श्री. डी. एम्. चौधरी | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्. ए. बी. एड्. |
| २१ | श्री. ए. डी. कडलग | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |
| २२ | श्री. जी. जे. नवले | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम्. ए. बी. एड्. |
| २३ | श्री. बी. एस्. जाधव | सहाय्यक शिक्षक | मानसशास्त्र | एम्. ए. बी. एड्. |
| २४ | श्री. बी. के. पवार | सहाय्यक शिक्षक | इतिहास | एम्. ए. बी. एड्. |
| २५ | श्री. टी. एस्. जाधव | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम्. ए. बी. एड्. |
| २६ | श्री. सी. एम्. डोंगरे | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |
| २७ | श्री. एस्. ए. गायकवाड | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |
| २८ | श्री. एस्. ए. लांडगे | सहाय्यक शिक्षक | गणित | एम्. एस्सी. बी. एड्. |
| २९ | श्री. व्ही. व्ही. वाकचौरे | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३० | श्री. जी. डी. लांडगे | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम्. ए. बी. एड्. |
| ३१ | श्री. एन्. पी. खाडगीर | सहाय्यक शिक्षक | मराठी व इतिहास | एम्. ए. बी. एड्. |
| ३२ | श्री. एस्. एस्. बिराजदार | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम्. ए. बी. एड्. |
| ३३ | श्रीमती एम्. पी. घोलप | सहाय्यक शिक्षक | गणित | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३४ | श्री. बी. आर. आवारी | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३५ | श्री. बी. एम्. गोर्डे | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३६ | श्री. आर. बी. कर्पे | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३७ | श्री. जी. बी. देशमुख | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३८ | श्री. एस्. डी. शिंदे | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ३९ | श्री. एस्. बी. काळे | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |
| ४० | श्री. एम्. जी. उगले | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. बी. एड्. |




*एखाद्या गोष्टीला धरून राहण्यात यश असते. पोस्टाच्या तिकीटाचेच पाहा ना !*

## क) शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| अ.नं. | नांव | हुद्दा | शिक्षण |
|---|---|---|---|
| १ | श्री. आगलावे एल्. व्ही. | प्रबंधक | एम्. ए.,डी. जे. |
| २ | श्री. तेलंग जी. व्ही. | अधीक्षक | बी. कॉम. |
| ३ | श्री. दारोळे व्ही. बी. | मुख्य लिपीक | बी. ए. बी. एड्. |
| ४ | श्री. गाडेकर आर. डी. | वरिष्ठ लिपीक | एम्. ए. |
| ५ | श्री. ढवळे सी. आर. | वरिष्ठ लिपीक | एम्. कॉम |
| ६ | श्री. मंडलीक एम्. बी. | कनिष्ठ लिपीक | एम्. ए . |
| ७ | श्री. बोडके एम्. डी. | ग्रंथालय लिपीक | बी. ए. एल्. टी. सी. |
| ८ | श्री. बगाड एस्. बी. | कनिष्ठ लिपीक | बी. कॉम् |
| ९ | श्री. साबळे के. एल. | प्रयोगशाळा सहाय्यक | बी. एस्सी. |
| १० | श्री. नवले पी. एस. | कनिष्ठ लिपीक | एस्. एस्. सी. |
| ११ | श्री. सय्यद एस्. बी. | कनिष्ठ लिपीक | एम्. ए. |
| १२ | श्री. जाधव डी. पी. | प्रयोगशाळा सहाय्यक | बी. एस्सी. |
| १३ | श्री. भालेराव बी. एल्. | ग्रंथालय लिपिक | बी. ए. बी. लिब |
| १४ | श्री. घुले पी. के. | सहाय्यक ग्रंथपाल | एम्. ए., एम्. लिब. |
| १५ | श्री. घासकर एस्. व्ही. | कनिष्ठ लिपीक | बी. ए. |
| १६ | श्री. रूपवते डी. बी. | ग्रंथालय परिचर | ९ वी |
| १७ | श्री. म्हसळकर एस्. जी. | ग्रंथालय परिचर | १० वी. पास्. |
| १८ | श्री. अस्वले बी. एच्. | ग्रंथालय परिचर | १० वी नापास |
| १९ | श्री. वाकचौरे बी.बी. | शिपाई | ३ री |
| २० | श्री. पडवळ एस्. टी. | ग्रंथालय परिचर | एम्. ए.बी. लीब |
| २१ | श्री. हुजबंद एस्. एस्. | ग्रंथालय परिचय | ८ वी |
| २२ | श्री. छल्लारे एन्. जी. | प्रयोगशाळा परिचर | १० वी नापास |
| २३ | श्री. पथवे जे. डी. | प्रयोगशाळा परिचर | १० वी नापास |
| २४ | श्री. वामन ए. बी. | प्रयोगशाळा परिचर | एम्. ए. |
| २५ | श्री. भांगरे टी. पी. | प्रयोगशाळा परिचर | १० वी नापास |
| २६ | श्री. आरोटे डी. व्ही. | ग्रंथालय परिचर | बी. ए. बी. कॉम्. एल. टी. सी. |
| २७ | श्री. भालेराव के. डी. | प्रयोगशाळा परिचर | बी. ए. |
| २८ | श्री. काठाळे एस्. एस्. | शिपाई | ८ वी. |
| २९ | श्री. नाईकवाडी एम्. व्ही. | प्रयोगशाळा परिचर | १२ वी |
| ३० | श्री. कडलग एस्. व्ही. | प्रयोगशाळा परिचर | १२ वी |
| ३१ | श्री. सावंत बी. एम्. | प्रयोगशाळा परिचर | १० वी नापास |
| ३२ | श्री. सोनवणे एच्. टी. | शिपाई | ११ वी पास |
| ३३ | श्री. इपकल आर. आर. | शिपाई | ११ वी पास |
| ३४ | श्री. चव्हाण आर. बी. | शिपाई | १२ वी पास |
| ३५ | श्रीमती भुजबळ पी. ई. | शिपाई | १२ वी नापास |
| ३६ | श्री. पथवे एस्. के. | शिपाई | १० वी नापास |
| ३७ | श्री. धुमाळ के. एस्. | शिपाई | बी. ए. |
| ३८ | श्री. फटांगरे एस्. बी. | ग्रंथालय परिचर | एम. ए. |
| ३९ | श्री. जेडगुले एल्. व्ही. | शिपाई | १२ नापास |





A/p.Ganore Tal. Akole, Dist.: Ahmednagar Tel.: 02424-261365


DEALERS IN
• Science
• Sports Materials
• Educational Aids
JOSHI
DAYO
SCIENTIFIC SALES

# AVON PUBLICATIONS

**Distributor & Library Supplires of All Kinds Books**

D-288/10, Ground Floor, Wadhwa Complex,
Show room No.9, Laxmi Nagar, Delhi-110092
Tel.:011-22504668



# श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड

**(खादी आणि ग्रामोद्योग कमिशन व्दारा मान्यता प्राप्त)**

३३/१६, राजलक्ष्मी, प्रभात रोड, गल्ली क्र.४, पुणे- ४११००४

दुरध्वनी: (०२०) २५६७१२८२, २५६७४१९८, २५६७०००७, २५६७७०५१, २५६७७९६४ फॅक्स : २५६७४४२०




SYMBOL OF WOMAN'S STRENGTH

SASA

DETERGENT POWDER & CAKE

"ससा करी जादू ; कपडे होती मुलायम मऊ"

# ससा

## डिटर्जंट पावडर व वडी

डिटर्जंट डिव्हीजन-सणसवाडी : सर्व्हे नं.८१९/२/१, सणसवाडी, तालुका-शिरुर, जिल्हा- पुणे ४१०२१०

दुरध्वनी : (०२१३७) २५२४९९, २५२२७८,२५३११२,२५३११३,२५२९६८ फॅक्स: (०२१३७) २५२००९

पुणे ऑफिस दुरध्वनी : (०२०)२५६७९३०२